www.lokrakshanay.com  epaper.lokrakshanay.com  dainiklokrakshanay@gmail.com  +91 97023 86118



गुडबाय हास्यजत्रा ; गौरवने घेतला हास्यजत्रेचा निरोप
पान ४ वर


# दैनिक लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ




२३ वर्षांच्या पाणी टंचाईच्या संघर्षाला ठाण्यातील गृहसंस्थेने दिली मात
पान ३ वर

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ • वर्ष - ०२, • अंक ०७ • पृष्ठे- ०६ • ठाणे, गुरूवार, ९ मे २०२४ • RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 • रु.२/-

## थोडक्यात

### रील स्टारने मतदान केंद्रावर बनवली रील; निवडणूक अधिकाऱ्याच्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल



.रायगड,विशाल पाटील :

लोकशाहीच्या या उत्सवात राजकारण्यांचा उत्साह दांडगा आहे, तर सोशल मीडियातील रील स्टारचा उत्साह पण शिगेला पोहचला आहे. पण काही जण या उत्साहात घोडचुका करताना दिसत आहे. अशीच एक मोठी चूक रायगड जिल्ह्यातील रील स्टारने केली आहे. रील तयार करण्याचे काही भान या पठ्ठ्याला उरले नाही. त्याने थेट मतदान करतानाचे रील तयार केले. इन्स्टाग्राम व्हिडिओचा त्यासाठी वापर केला. हा व्हिडिओ व्हॉट्सअॅप स्टेटसला ठेवला. आता पोलिस त्याच्या मागावर आहे आणि रील स्टारने धूम ठोकली आहे.रायगड जिल्ह्यात काल उत्साहात मतदान झाले. रेवदंडा येथील 12 क्रमांकाच्या मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया सुरळीत सुरु होती. त्यावेळी दुपारी एक व्यक्ती मतदानासाठी आली. तिने मतदान करतानाचा रील काढली. लागलीच हा व्हिडिओ या पठ्ठ्याने विविध समाज माध्यमांवर शेअर पण केला. एका अधिकाऱ्याच्या ही बाब लक्षात आली. त्याने तातडीने पोलिसांना याविषयीची माहिती दिली. अधिकाऱ्यांनी या मतदाराचं नाव लागलीच हुडकून काढलं. प्रसाद शरद गोंधळी याने हा मोठा गोंधळ घातल्याचे समोर आले. त्याने मतदान करताना खिशातून मोबाईल काढला. त्याच्या आवडीच्या उमेदवाराला मतदान करतानाचा व्हिडिओ तयार केला. त्याची एक रील तयार केली. मतदान करतानाचा त्याने हा प्रकार केला. रील तयार झाल्यावर लगेचीच ती इन्स्टाग्रामवर शेअर केली. त्यानंतर हा व्हिडिओ व्हॉट्सअॅप स्टेटसला ठेवला. मतदान प्रक्रियेत गोपनियता पाळणे आवश्यक असते. गोंधळी याने गोपनियतेचा भंग केला. त्यामुळे निवडणूक अधिकाऱ्याच्या तक्रारीवरुन त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. रेवदंडा पोलीस ठाण्यात तक्रारीनंतर पुढील प्रक्रिया सुरु आहे. एका रीलच्या चक्करमध्ये त्याने मनस्ताप मात्र करुन घेतला.

### एपीएमसी फळ बाजारात सामायिक जागेचा अतिरिक्त वापर करणाऱ्यांवर कारवाई



.नवी मुंबई, भावना जैन :

एपीएमसी बाजारात घडलेल्या अग्नितांडवात मोठ्या प्रमाणात एपीएमसीतील गाळ्यांचे नुकसान झाले होते. त्यामुळे एपीएमसी प्रशासनाने अग्नी अहवाल तयार केला होता. त्या अहवालात बाजारातील अतिक्रमण, गाळ्यांव्यतिरिक्त सामायिक जागेचा अतिरिक्त वापर यामुळे आगीच्या घटना घडत असल्याचा ठपका ठेवला होता. यादरम्यान एपीएमसी फळ बाजारात सामायिक जागेचा अतिरिक्त वापर करणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. जानेवारी ते मे महिन्यात आतापर्यंत १७० जणांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. मुंबई कृषी उत्पन्न फळ बाजार समितीत जानेवारीनंतर आंबा, कलिंगड, पपई इत्यादी फळांचा हंगाम सुरू होतो. विशेषतः हापूसचा हंगाम सुरू झाला असून,बाजारात मोठ्या प्रमाणात लाकडी पेट्या दाखल होत आहेत. आगीची घटना घडली त्यावेळी मोठ्या प्रमाणात पुठ्ठे, गवत आणि लाकडी पेट्या होत्या. त्यामुळे आगीचे लोळ लांबपर्यंत पसरले होते तर २५-३० गाळ्यांचे नुकसान झाले होते. त्यामुळे प्रशासनाने गाळ्यांव्यतिरिक्त सामायिक जागेचा वापर तसेच मालवाहक्यांवर गाडी उभी करून व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. जानेवारीत ५४ , फेब्रुवारी मध्ये ७३, मार्चमध्ये ३०, एप्रिलमध्ये१२, तर मे महिन्यात आतापर्यंत एका व्यावसायिकावर कारवाई करण्यात आली आहे.

### खाणाखुणांद्वारे दिलेली साक्ष ठरली महत्त्वाची

# न्यायालयाने आरोपीला सुनावली १० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा

.पुणे, अभिजित येरल्लू :



विशेष मुलीवर झालेल्या बलात्कार प्रकरणात मुलीने खाणाखुणांनी न्यायालयात साक्ष दिली. पीडित मुलीची साक्ष खटल्यात महत्त्वाची ठरली. न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवून जिल्हा सत्र न्यायाधीश डी. पी. रागीट यांनी आरोपीला दहा वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सुनावली. आरोपीला न्यायालयने दहा हजार रुपये दंड भरण्याचे आदेश दिले असून, दंड न भरल्यास न्यायालयाने एक वर्षाच्या शिक्षेची तरतूद निकालपत्रात केली आहे. प्रताप बबनराव भोसुरे (वय ५९ रा. धानोरे ता. शिरुर जि. पुणे) असे शिक्षा सुनावलेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत पीडित मुलीच्या आईने शिक्रापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. १८ मे २०१५ रोजी मुलगी रानात शेळ्यांना घेऊन गेली होती. आरोपी भोसुरेने तिला गोळी देण्याचे आमिष दाखवून रानातील एका निर्जन जागेत तिच्यावर बलात्कार केला. बलात्कारानंतर मुलगी गर्भवती झाली. आरोपीला याप्रकरणात अटक करण्यात आली होती. तेव्हापासून तो येरवडा कारागृहात आहे. या खटल्यात सरकार पक्षाकडून अॅड. लीना पाठक यांनी बाजू मांडली. सरकार पक्षाकडून नऊ साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली होती. पीडित मुलीने न्यायालयात खाणाखुणांनी साक्ष दिली. कॅमेऱ्यातील मुलीची साक्ष नोंदवून घेण्यात आली.

पान २ वर

# लोकसभेची रणधुमाळी सुरु असतानाच महाराष्ट्रात पुन्हा एका निवडणुकीची घोषणा

.ठाणे, यश सावंत :



लोकसभा निवडणुकीच्या पाठोपाठ आता महाराष्ट्रात आणखी एका निवडणुकीचं बिगूल वाजलं आहे. विधान परिषदेच्या दोन शिक्षक आणि दोन पदवीधर मतदारसंघांच्या निवडणुकीचं बिगूल वाजलं आहे. निवडणूक आयोगाकडून याबाबतची घोषणा करण्यात आली आहे. विधान परिषदेच्या मुंबई पदवीधर मतदारसंघ आणि कोकण विभाग पदवीधर मतदारसंघ या दोन जागांसाठी निवडणूक जाहिर झालीय. तसेच नाशिक आणि मुंबईच्या शिक्षक मतदारसंघासाठी निवडणूक जाहिर झाली आहे. या चारही जागांवरील विद्यमान आमदारांचा कार्यकाळ हा येत्या 7 जुलैला संपुष्टात येणार आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाकडून या दोन पदवीधर आणि दोन शिक्षक मतदारसंघांची निवडणूक जाहिर झाली आहे.निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, या चारही जागांसाठी 10 जूनला मतदान पार पडणार आहे. तर 13 जूनला मतमोजणी होणार आहे. मुंबई पदवीधर मतदारसंघावर सध्या विलास पोतनीस हे विद्यमान आमदार आहेत. कोकण विभाग पदवीधर मतदारसंघावर निरंजन डावखरे हे विद्यमान आमदार आहेत. नाशिक विभाग शिक्षक मतदारसंघावर किशोरे दराडे हे विद्यमान आमदार आहेत. तर मुंबई शिक्षक मतदारसंघात कपिल पाटील हे विद्यमान आमदार आहेत. या सर्व आमदारांचा विधान परिषदेचा कार्यकाळ हा येत्या 7 जुलै 2024 ला संपणार आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाकडून या चार जागांसाठी निवडणूक घेण्यात येत आहे.या निवडणुकीसाठी 15 मे ला नोटीफिकेशन निघेल.

पान २ वर

### चार महिन्यांपासून आशा स्वयंसेविकांना मानधन नाही; उपासमारीची वेळ

.मुंबई, दिगंबर जाधव:



राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत ग्रामीण, शहरी आणि आदिवासी भागातील नागरिकांपर्यंत आरोग्य सेवा पोहचविण्याचे काम ७४ हजार आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक करीत आहेत. मात्र मागील चार महिन्यांपासून राज्य सरकारकडून देण्यात येणारे मानधन या आशा स्वयंसेविकांना मिळालेले नाही. त्यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह करताना आशा स्वयंसेविकांना अवघड बनले आहे.राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राज्यातील प्रत्येक नागरिकाला आरोग्य सेवा मिळावी यासाठी ७४ हजार आशा स्वयंसेविका कार्यरत आहेत. या आशा स्वयंसेविकांना केंद्र सरकार व राज्य सरकारच्या माध्यमातून मानधन देण्यात येते. राज्यातील आशा स्वयंसेविकेला महिन्याला १३ हजार रुपये मानधन मिळते. त्यापैकी ८ हजार रुपये राज्य सरकारकडून दिले जातात, तर मानधनाची उर्वरित रक्कम केंद्र सरकारकडून दिली जाते. केंद्र सरकारकडून देण्यात येणारे मानधन आशा स्वयंसेविकांना वेळेवर मिळत आहे.

पान २ वर

# आता रेल्वे प्रवाशांना घर बसल्या लोकल ट्रेनचे तिकीट बुक करता येणार



.मुंबई, विशाल कारंडे :

रेल्वे स्थानकातील तिकीट खिडक्यांवरील रांगा कमी करण्यासाठी रेल्वेने काही वर्षांपूर्वी यूटीएस अॅप आणले होते. परंतु या यूटीएस अॅपमध्ये ई-तिकीट काढताना रेल्वे स्थानकापासून ठराविक अंतर उभे राहून ई-तिकीट बुक करावी लागत होती. त्यामुळे प्रवास करताना स्थानकाच्या हद्दीच्या जवळआल्यानंतर तिकीट जनरेट होऊन आपले पैसे बँक खात्यातून वळते व्हायचे. परंतु आता रेल्वेने पेपरलेस तिकीट बुक करताना असलेली हद्दीची अट रद्द केली आहे. त्यामुळे आता प्रवाशांना घर बसल्या लोकल्स ट्रेनचे तिकीट बुक करता येणार असल्याचे पश्चिम रेल्वेने म्हटले आहे. तत्कालिन रेल्वे मंत्री सुरेश प्रभू यांच्या कार्यकाळात साल 2014 मध्ये मुंबई उपनगरीय मार्गावर प्रथमच युटीएस मोबाईल अॅपचे लॉंचिंग करण्यात आले होते. तिकीट घरांच्या रांगा कमी करण्यासाठी मोबाईलवरुन ऑनलाईन तिकीट काढण्याचा हा पर्याय सुरुवातीला तितकासा लोकप्रिय झाला नाही. कारण हद्दीची अट तसेच पैसे कापले जाऊनही ई- तिकीट मिळत नसल्याने फारसे प्रवासी मोबाईलने तिकीट काढण्याचा फंदात पडायचे नाहीत. आता युटीएस ऑनलाइन मोबाइल अॅपमधून उपनगरीय आणि लांबपल्ल्याच्या गाड्यांची तिकीटे ऑनलाईन बुक करता येत आहेत.

पान २ वर

### कल्याण-सीएसएमटी सकाळची १५ डबा लोकल तीन महिन्यांपासून गायब



.ठाणे, रोहित जैसवाल :

सकाळी मुंबईला जाणाऱ्या प्रवाशांच्या गर्दीवर उपाय म्हणून मध्य रेल्वे प्रशासनाने सकाळच्या वेळेत कल्याण ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस १५ डब्यांची लोकल गेल्या वर्षीपासून सुरू केली आहे. अशा प्रकारच्या दोन लोकल आहेत. यामधील एक लोकल गेल्या तीन महिन्यांपासून गायब असल्याने रेल्वे प्रवासी नाराजी व्यक्त करत आहेत.कल्याण रेल्वे स्थानकातून सकाळी ८.३२ वाजता सुटणारी १५ डब्यांच्या लोकलमुळे प्रवाशांना धक्के खाण्यापेक्षा सुखाने प्रवास करता येत होता. या लोकलला महिलांसाठी दोन स्वतंत्र डबे, प्रथम श्रेणीचे वाढीव डबे होते. त्यामुळे नियमित लोकलवर येणारा भार या लोकलमुळे कमी होत होता.

पान २ वर

# जमिनीच्या वादात चक्क मारुतीरायालाच केलं पक्षकार; न्यायालयाने ठोठावला एक लाखाचा दंड

.नवी दिल्ली, प्रगती शर्मा :





भारतात जमिनीच्या वादाच्या प्रकरणांची कमतरता नाही. न्यायालयांमध्ये अशी हजारो प्रकरणे प्रलंबित आहेत. दिल्ली उच्च न्यायालयात जमिनीच्या वादाचे एक प्रकरण दाखल झाले, त्याची चर्चा होत आहे. खासगी जमीन हडप करण्यासाठी चक्क भगवान हनुमानाला पक्षकार करण्यात आले होते. उच्च न्यायालयाने भगवान हनुमानाला प्रतिवादी करणाऱ्या व्यक्तीला एक लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. या प्रकरणावर नाराजी व्यक्त करताना न्यायालयाने सदर प्रकरण म्हणजे कायदेशीर प्रक्रियेचा दुरुपयोग आणि कायदेशीर प्रथेला अपायकारक असा हा प्रयोग असल्याचे म्हटले. उच्च न्यायालयाचे न्यायाधीश हरी शंकर यांनी पक्षकाराला एक लाखाचा दंड ठोठावताना म्हटले की, माझ्या न्यायालयात देवच पक्षकार होईल, असे मला कधीही वाटले नव्हते.एका खासगी जमिनीवरील भगवान हनुमानाच्या मंदिराबाबत सदर खटला दाखल करण्यात आला होता. अंकित मिश्रा यांनी हा खटला दाखल करताना दावा केला की, खासगी जमिनीवर स्थित असलेले मंदिर सार्वजनिक असल्यामुळे ही जमीन भगवान हनुमानाची होते. तसेच मिश्रा हे हनुमानाचे जवळचे मित्र आणि भक्त असल्यामुळे भगवान हनुमानाच्यावतीने ते हा खटला दाखल करत आहेत. ही जमीन विकण्याचा किंवा हस्तांतरीत करण्याचा मूळ मालकाला अधिकार नाही, असेही या याचिकेत म्हटले गेले होते. सदर मंदिर दिल्लीच्या उत्तर नगर भागात स्थित आहे.अंकित मिश्रा यांच्या याचिकेला कनिष्ठ न्यायालयाने फेटाळून लावले होते. जिल्हा अतिरिक्त न्यायाधीशांनी ही याचिका फेटाळून लावताना सांगितले होते की, अपीलकर्ते मिश्रा यांचा खासगी जमिनीवर कोणताही अधिकार नाही. यासाठी ही जमीन कुणाला विकली जाते किंवा तिचे हस्तांतरण कुणाकडे केले जाते, यावर मिश्रा प्रश्न उपस्थित करू शकत नाहीत. खालच्या न्यायालयाने याचिका फेटाळून लावल्यानंतर अंकित मिश्रा यांनी उच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला होता.सदर अपील न्यायालयाने फेटाळून लावताना म्हटले की, हे मंदिर सार्वजनिक होते, असे दर्शविणारा एकही पुरावा समोर आलेला नाही. एखाद्या खासगी मंदिरात जर कुणी पूजा करत असेल तर ते सार्वजनिक मंदिर होत नाही. मंदिराच्या मालकाच्या परवानगीशिवाय किंवा एखादे मंदिर सार्वजनिक असल्याशिवाय इतरांना मंदिरात दर्शन घेण्याचा अधिकार नाही.अपीलकर्ते अंकित मिश्रा यांना एक लाखांचा दंड ठोठावल्यानंतर मिश्रा यांनी युक्तिवाद केला की, दंडाची रक्कम भगवान हनुमान आणि त्यांच्यात वाटून द्यावी.

पान २ वर

# शरद पवार हे गांधी विचारांचे, प्रादेशिकपक्ष काँग्रेसमध्ये विलीन होतील त्यांच्या विधानात तथ्य..' - विजय वडेट्टीवार

.नागपूर, नितीन देवळेकर :



सध्याचे सत्ताधारी पक्ष अवकाळी पावसासारखे जनसामान्यांना उद्ध्वस्त करणारे आहेत. काँग्रेस मात्र, नियमित होणाऱ्या पावसासारखे असून ते जनतेला सुखावणारे आहे. शरद पवार हे मूळचे गांधी विचारांचे असून अनेक प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होतील या त्यांच्या विधानात तथ्य आहे, असे वक्तव्य विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केले. वडेट्टीवार आज नागपूर निवासस्थानी माध्यमाच्या प्रतिनिधींशी बोलत होते. केंद्रातील सत्ताधाऱ्यांच्या जुलमी, अत्याचारी आणि हुकूमशाही प्रवृत्तीला जनता विटलेली आहे. त्यांना बदल हवा आहे. २०२४ मध्ये सत्ता परिवर्तन होईल आणि काँग्रेससोबत अनेक पक्ष जुळतील तसेच काही प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होतील. शरद पवार यांच्यासारख्या अनुभवी राजकीय नेते फार दूरवरचा विचार करून भाष्य करीत असतात. शरद पवार हे मूळचे गांधी विचाराचे आहेत. गांधी विचार कोणी पुसू शकत नाही, संपवू शकत नाही. काही राजकीय पक्ष अवकाळी पावसासारखे आहेत. काँग्रेस हा नियमित पाऊस आहे. अवकाळी पावसासारखे सत्तेत आलेले पक्ष जनतेचे नुकसान करतात. ज्याप्रमाणे अवकाळी पाऊस शेती आणि जनसामान्यांना उद्ध्वस्त करतो. तशीच स्थिती आताच्या सत्ताधारी पक्षाची स्थिती आहे, अशी टीका वडेट्टीवार यांनी केली.सातारा येथे ४ मे रोजी शशिकांत शिंदे यांच्या प्रचारासभेनंतर इंडियन एक्स्प्रेस वृत्तपत्राशी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी नजिकच्या काळात अनेक प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होतील असे भाकीत केले होते. तसेच त्यांनी काँग्रेस आणि त्यांचा राष्ट्रवादी पक्ष हे दोघे गांधी आणि नेहरू विचारसरणीने चालणारे आहेत.

पान २ वर

# मालमत्ता कर थकवणाऱ्या मालाडमधील शैक्षणिक संस्थेच्या संगणक केंद्रावर महापालिका प्रशासनाची जप्तीची कारवाई

.मुंबई, सचिन कदम :





मुंबई महापालिका प्रशासनाने मालमत्ता करवसुलीचे उद्दिष्ट्य पूर्ण करण्यासाठी थकबाकीदारांवर कारवाईचा बडगा उगारण्यास सुरूवात केली आहे. महापालिकेने मालमत्ता कर थकवणाऱ्या तीन मालमत्ताधारकांवर जप्ती आणि अटकावणीची कारवाई केली. या कारवाईत पी-उत्तर विभाग कार्यालयाच्या हद्दीतील मालाडमधील कला विद्या मंदिर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नालॉजी या शैक्षणिक संस्थेचे संगणक केंद्र जप्त करण्यात आले. तर वडाळा येथील न्यू नॅशनल मार्केटचे दोन व्यावसायिक गाळे आणि पवई येथील चारभुजा मार्बल आर्ट या दुकानाचा समावेश आहे. या तीनही मालमत्ताधारकांकडे एकूण ०४ कोटी १३ लाख ८८ हजार ५७७ रुपयांची कर थकबाकी आहे.मुंबईकरांना गेल्या आर्थिक वर्षातील मालमत्ता कराची देयके वितरित करण्यास उशीर झाल्यामुळे यंदा मालमत्ता कर वसुली करताना पालिकेच्या नाकीनऊ आले आहेत. करभरणा करण्यासाठी यंदा ३१ मार्चपर्यंत २५ मेपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. मालमत्ता कर वसुलीचे लक्ष्य गाठण्यासाठी करनिर्धारण आणि संकलन खात्याने विविध उपाययोजना केल्या आहेत. कर वसुलीचे उद्दिष्ट गाठण्यासाठी करनिर्धारण आणि संकलन विभागाने अतिशय सूक्ष्म पद्धतीने नियोजन केले आहे. तसेच गेल्या अनेक वर्षापासून मालमत्ता कराची थकबाकी असलेल्या करधारकांकडेही करनिर्धारण विभागाने पाठपुरावा सुरू केला आहे. सातत्याने आवाहन, तसेच वारंवार पाठपुरावा करूनही मालमत्ता कराचा भरणा करण्यास टाळाटाळ करणाऱ्या मालमत्ताधारकांवर पालिकेने कठोर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे.महानगरपालिकेने मंगळवारी मुंबईतील तीन मालमत्तांवर जप्ती व अटकावणीची कारवाई केली. मुंबई महानगरपालिका अधिनियम-१८८८ च्या कलम २०५ नुसार, जप्ती आणि अटकावणीची कारवाई करण्यात आल्याची माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली. मालाड येथील कला विद्या मंदिर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नालॉजीकडे तीन कोटी ८८ लाख रुपये मालमत्ता कर थकीत आहे. या शैक्षणिक संस्थेतील संगणक केंद्र जप्त करून अटकावणीची कारवाई करण्यात आली.

पान २ वर

### उल्हासनगरातील मध्यवर्ती रुग्णालयात रुग्णांना भेटण्यासाठी येणारे नातेवाईक रुग्णांना पुरवतात दारू, गांजा,गुटखा

.उल्हासनगर, विशेष प्रतिनिधी :



मध्यवर्ती रुग्णालयातील रुग्णांना भेटण्यासाठी येणारे नातेवाईक दारू, गांजा, गुटखा आदी साहित्य पुरवीत असल्याचे उघड झाले. रुग्णालयात येणाऱ्या रुग्ण नातेवाईकांच्या अंगझडतीत दारू, गांजा, गुटखा सापडल्याची माहिती रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. बनसोडे यांनी दिली आहे.उल्हासनगरातील मध्यवर्ती रुग्णालयात कर्जत, कसारा, शहापूर, मुरबाड, अंबरनाथ, बदलापूर यांच्यासह ग्रामीण परिसरातून शेकडो नागरिक उपचार करण्यासाठी येतात. रुग्णालयाच्या बाह्यरुग्ण विभागात दररोज एक हजार पेक्षा जास्त रुग्णांची नोंद होत आहे. तर क्षमतेपेक्षा जास्त रुग्ण उपचार घेत असल्याची परिस्थिती मध्यवर्ती रुग्णालयाची आहे. रुग्णालयाच्या भिंती व स्वच्छतागृह गुटख्याच्या पिचकाऱ्याने रंगल्याचे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ मनोहर बनसोडे यांच्या लक्षात आले. त्यांनी रुग्णांना भेटण्यासाठी आलेल्या नातेवाईकांची रुग्णालय प्रवेशद्वारावर अंगझडती घेण्याचे आदेश दिले.

पान २ वर

## संपादकीय

# युरोपच्या अर्थव्यवस्थेची झालेली अस्वस्थता

युक्रेनच्या युद्धामुळे युरोपचे राजकारण ढवळून निघाले आहे. या युद्धाबाबत अमेरिकेचा हट्ट, 'ब्रेक्झिट'द्वारे युरोपीय राजकारणातून बाहेर पडूनदेखील 'नाटो'च्या आधाराने युरोपमध्ये आपले हितसंबंध आहेत, हे दाखविण्याची ब्रिटनची धडपड आणि या युद्धामुळे युरोपच्या अर्थव्यवस्थेत निर्माण झालेली अस्वस्थता असे एकूण चित्र आहे.रशियावर ऊर्जेसाठी अवलंबून असल्यामुळे सुरवातीला युरोपीय महासंघातील राष्ट्रे या युद्धात पडण्यास तयार नव्हती. फ्रान्स आणि जर्मन यांनी संवादाचे प्रयत्न केलेही. परंतु अमेरिकेला युरोपीय राजकारणात स्थान टिकवायचे असेल, तर 'नाटो' हाच खरा मार्ग होता.'नाटो'चा प्रसार व्हावा, त्यात सोव्हिएत रशियातील पूर्वीचे देश तसेच पूर्व युरोपीय देश सामील व्हावेत, यासाठी क्लिंटन व ओबामा या अमेरिकी अध्यक्षांनी प्रयत्न केले. 'नाटो'मधील आपले स्थान पक्के करायचे असेल तर 'रशियाचा धोका' हे कारण कायम पुढे ठेवण्याची गरज होती. युक्रेनच्या निमित्ताने ही संधी त्यांना मिळाली.डोनाल्ड ट्रम्प अध्यक्ष असताना त्यांनी 'नाटो'मधून अमेरिका बाहेर पडू शकते, अशी धमकी दिली होती. एका पातळीवर युरोपीय राष्ट्रांना अमेरिकेच्या सहभागाची गरज होती. परंतु दुसऱ्या पातळीवर युरोपीय राष्ट्रे स्वतःचे संरक्षणविषयक आराखडे मांडू शकत होती आणि युरोपीय सत्ताव्यवस्थेत रशिया हा एक अविभाज्य घटक आहे, हे ते मान्य करीत होते.म्हणूनच जेव्हा रशियाने क्रिमियाचा ताबा घेतला, तेव्हा युरोपीय राष्ट्रांनी फार विरोध केला नाही. पुढे युक्रेनमधील प्रामुख्याने रशियन वांशिक प्रजा असलेल्या क्षेत्रात रशियाने हस्तक्षेप केला तेव्हादेखील युरोपीय राष्ट्रे शांत राहिली.मात्र युक्रेन युद्ध सुरू झाले आणि अमेरिकेने 'नाटो'च्या क्षेत्राखाली रशियाविरोधी भूमिका मांडायला सुरवात केली. या भूमिकेत 'नाटो'चा प्रत्यक्ष सहभाग नव्हता. कारण तसे झाले असते तर ते रशियाविरुद्ध 'नाटो' (म्हणजेच अमेरिका) असे युद्ध झाले असते.परंतु 'नाटो'ची राष्ट्रे आपल्यापरीने युक्रेनला मदत करू लागली. अमेरिकेच्या बरोबरीने पुढाकार घेतला तो ब्रिटनने. कारण या युद्धाची प्रत्यक्ष झळ युरोपला बसणार होती; अमेरिका किंवा ब्रिटनला नव्हे. 'ब्रेक्झिट'मुळे युरोपीय महासंघाला एकप्रकारे फायदा झाला होता. कारण ब्रिटनचा सहभाग नेहमी अर्धवट होता.त्याला युरोपीय राजकारणात स्थान हवे होते, मात्र महासंघाचे नियम नको होते. स्थलांतरितांबाबत ब्रिटन स्वतःला वेगळे ठेवू इच्छित होता. युरोपीय राष्ट्रे शेवटी नाइलाजाने युक्रेनच्या मदतीला पुढे आली. ते युद्ध जसे चिघळले, तशा युरोपात नव्या समस्या आल्या.त्यात युरोपीय महासंघाचा प्रादेशिकवाद आणि त्याविरोधात राष्ट्रवाद असा झगडा पुढे आलेला दिसतो. युद्धाची आर्थिक झळ सर्वसामान्यांना जाणवत आहे. त्यातून शेतकऱ्यांचे आंदोलन सुरू झाले.पारंपरिक राष्ट्रवादाच्या भावनांना छेद देऊन उदारमतवादी, लोकशाही विचारांच्या राष्ट्रांनी एकत्र येऊन प्रादेशिक ऐक्य साधणे, हे युरोपीय महासंघाच्या प्रकल्पाचे स्वरूप होते. म्हणूनच १९९१ नंतर पूर्व युरोप व मध्ययुरोपीय राष्ट्रांना युरोपीय महासंघात समाविष्ट केले गेले.त्यातील एक अलिखित संकेत असा होता, की राष्ट्रे ख्रिश्चनधर्मीय व गोऱ्या वांशिक प्रजेची असावीत. म्हणूनच त्या संघटनेत मोरोक्को किंवा तुर्कस्थानला प्रवेश दिला जात नाही. युरोपीय महासंघात प्रत्येक राष्ट्राच्या सार्वभौमत्वावर तसेच राष्ट्रीय ओळखीवर काही मर्यादा आहेत.मुक्त व्यापार, तेथील नागरिकांचा या क्षेत्रात मुक्त संचार, युरो हे समान चलन, युरोपीय संसद व सर्वांना लागू असलेले त्याचे नियम यामुळे त्या प्रादेशिकवादाला एक वेगळे स्वरूप मिळाले होते. या सगळ्याला प्रथम आव्हान मिळाले ते २००८ च्या मंदीने.त्या संकटाचा फटका ग्रीस, इटली, स्पेन यांना बसला. त्यावेळी तेथील राष्ट्रवाद जागृत झाला आणि युरोपीय महासंघाच्या जाचक अटींविरुद्ध आंदोलने झाली. दुसरे आव्हान म्हणजे मध्य आशियातून निर्वासितांचा ओघ वाहू लागला.ते मुख्यतः भूमध्य सागरामार्गे किंवा पूर्व युरोपमार्गे येत होते. त्यांना सामावून घेतले तर आपल्या संस्कृतीवर विपरित परिणाम होईल, अशी भीती या देशांना वाटत होती. हे निर्वासित प्रामुख्याने मुस्लिम होते.आर्थिक मंदी आणि निर्वासितांचे ओझे यामुळे युरोपीय अर्थव्यवस्थेवर ताण आला. त्यातच युक्रेन समस्येची भर पडली. फ्रान्स आणि जर्मनी या दोन औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या देशांना मंदीचा सामना करावा लागत आहे.तेथे शेतकऱ्यांच्या आंदोलने झाली ती या पार्श्वभूमीवर. पर्यावरणरक्षणासाठी युरोपीय महासंघाचे शेतीबाबत काही नियम आहेत.

## आजची चित्रोळी



मृदुल जल जरी वरुनी बरसतां
महाकाय दिसते !
धरती वरती त्या योगाने
नंदनवन फुलते !!

मुकुंद कुलकर्णी,
कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई

## पान १ वरून

### न्यायालयाने आरोपीला सुनावली १० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा

साक्ष, तसेच वैद्यकीय पुरावे ग्राह्य धरून न्यायालयने आरोपीला दहा वर्षे सक्तमजुरी आणि दहा हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. शिक्रापूर पोलीस ठाण्याचे तत्कालिन सहायक पोलीस निरीक्षक हेमचंद्र खोपडे यांनी याप्रकरणाचा तपास केला. न्यायालयीन कामकाजात पोलीस हवालदार विद्याधर निचित, एस. बी. भागवत, ज्ञानदेव सोनवणे यांनी सहाय केले.

### चार महिन्यांपासून आशा स्वयंसेविकांना मानधन नाही; उपासमारीची वेळ

मात्र राज्य सरकारच्या हिश्यातून देण्यात येणारे मानधन जानेवारीपासून मिळालेले नाही. त्यामुळे आरोग्य सेविकांची आर्थिक कोंडी होत आहे. अल्प मानधनावर काम करणाऱ्या आशा स्वयंसेविका मिळणाऱ्या मानधनातूनच प्रवास खर्च करून गावागावात, खेडोपाडी जाऊन नागरिकांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्याचे काम करतात.मात्र सरकारी यंत्रणांचे त्यांच्याकडे दुर्लक्ष होत आहे. मागील चार महिन्यांपासून राज्य सरकारने मानधन न दिल्याने आशा स्वयंसेविकांवर उपासमारीची वेळ आली आहे. त्यामुळे त्यांना जानेवारी २०२४ पासूनचे थकीत मानधन विनाविलंब देण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य गटप्रवर्तक व आशा स्वयंसेविका संघाचे अध्यक्ष एम. ए. पाटील यांनी राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे आयुक्त आणि मुंबई महानगरपालिकेच्या संयुक्त कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली आहे.

### काँग्रेसमध्ये विलीन होतील त्यांच्या विधानात तथ्य..' - विजय वडेट्टीवार

मात्र, याबाबत कोणताही निर्णय सहकाऱ्यांच्या संमतीने होईल. आम्ही घाईन कोणताही निर्णय घेणार नाही, असेही पवार म्हणाले होते. याबाबत विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार म्हणाले, विद्यमान सत्ताऱ्यांच्या जुलमी, अत्याचारी आणि हुकूमशाही प्रवृत्तीला जनता विटलेली आहे. २०२४ च्या निवडणुकीनंतर अनेक पक्ष काँग्रेस मध्ये विलीन होतील. या पवार यांच्या म्हणण्यात तथ्य आहे. पवार सारखे मोठे नेते जेव्हा बोलतात, ते फार दूरवरचा विचार करून बोलत असतात. २०२४ मध्ये सत्तापरिवर्तन होणार आणि त्यानंतर अनेक पक्ष काँग्रेससोबत येतील आणि काही पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होतील, असा दावाही वडेट्टीवार यांनी केला

### मालमत्ता कर थकवणाऱ्या मालाडमधील शैक्षणिक संस्थेच्या संगणक केंद्रावर महापालिका प्रशासनाची जप्तीची कारवाई

वडाळा येथील रफी अहमद किडवाई मार्गावरील न्यू नॅशनल मार्केटकडे ५९ लाख ८८ हजार ५७० रुपयांची थकबाकी आहे. त्यामुळे, या मार्केटमधील दोन व्यावसायिक गाळ्यांवर जप्ती आणि अटकावणीची कारवाई करण्यात आली. पवई येथील चारभुजा मार्बल आर्ट या मालमत्तेचा २६ लाख रुपये कर थकीत आहे. त्यामुळे, या मालमत्तेवर जप्ती आणि अटकावणीची कारवाई करण्यात आली. दरम्यान, जप्ती आणि अटकावणीची कारवाई झालेल्या या मालमत्ताधारकांनी पुढील पाच दिवसांच्या आत करभरणा न केल्यास जप्त केलेल्या मालमत्तेची लिलावाद्वारे विक्री करण्यात येईल, असा इशारा पालिका प्रशासनाने दिला आहे.

### जमिनीच्या वादात चक्क मारुतीरायालाच केलं पक्षकार; न्यायालयाने ठोठावला एक लाखाचा दंड

यावरही न्यायालयाने स्पष्ट केले की, दंडाची पूर्ण रक्कम मिश्रा यांच्याकडूनच वसूल केली जाईल. जमिनीचे मूळ मालक सूरज मलिक यांना ही दंडाची रक्कम देण्यात येणार आहे.

### आता रेल्वे प्रवाशांना घर बसल्या लोकल ट्रेनचे तिकीट बुक करता येणार

परंतू आता यूटीएस ऑनलाइन मोबाइल ॲपवरील जियो-फेंसिंगची हद्द हटविली आहे. त्यामुळे आता प्रवाशांना स्थानकाच्या जवळ जाऊन तिकीट मोबाईलवर तिकीट बुक करण्याची काही गरज राहणार नाही. तर घरातून तिकीट बुक करुन आरामात प्रवास करता येणार आहे.

आता यूटीएस मोबाईल ॲपवरील जिओ-फेन्सिंगची निर्बंधांची बाह्य मर्यादा हटविण्यात आली आहे. जिओ-फेन्सिंगची बाह्य मर्यादा हटवल्यामुळे प्रवासी आता घरी बसून कोणत्याही ठिकाणाहून कोणत्याही गंतव्य स्थानकासाठी तिकीट बुक करू शकणार आहेत. तथापि, प्रवाशांनी तिकीट आरक्षित केल्यापासून एक तासाच्या आत उपनगरीय लोकलचा प्रवास सुरु करावा तसेच लांबपल्ल्याच्या गाड्यांच्या बाबतीत तीन तासांच्या आत प्रवास सुरु करणाऱ्या स्टेशनवरून ट्रेनमध्ये चढणे आवश्यक आहे. यूटीएस ऑन मोबाइल ॲप वापरल्यामुळे सुट्ट्ये पैसे बाळगण्याची गरज नाही, तसेच रांगात उभे राहून वेळ वाया घालविण्याची गरज नाहीत, तसेच आणखीन एक अतिरिक्त फायदा म्हणजे प्रवाशांना आर-वॉलेट रिचार्जवर 3% बोनस मिळणार असल्याचे पश्चिम रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी सुमित ठाकूर यांनी म्हटले आहे.

### कल्याण-सीएसएमटी सकाळची १५ डबा लोकल तीन महिन्यांपासून गायब

या लोकलला महिलांसाठी वाढीव डबे असल्याने महिला प्रवाशांना धक्केबुक्के न खाता लोकलमध्ये शिरता येत होते. या १५ डब्यांच्या लोकलमुळे कल्याण, डोंबिवली, ठाणे दरम्यानच्या फलाटांवरील प्रवाशांना नऊ आणि १२ डब्याच्या लोकलपेक्षा दिलासा मिळत होता.अशाप्रकारच्या दोन लोकल सकाळच्या दरम्यान होत्या. यामधील कल्याणहून सकाळी ८.३२ वाजता सुटणारी लोकल गेल्या तीन महिन्यांपासून बंद आहे. प्रवाशांसाठी महत्वाची असणारी ही लोकल का बंद आहे याचे कोणतेही कारण रेल्वे प्रशासनाकडून प्रवाशांना दिले जात नाही. ही लोकल सुरू करावी म्हणून रेल्वे प्रवासी, प्रवासी संघटना रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा करत आहेत, त्यांना कोणी दाद देत नाही.कल्याण ते ठाणे दरम्यान रेल्वे प्रवाशांचे गर्दीमुळे लोकलमधून पडून मृत्यू होण्याचे प्रमाण वाढत आहे. यावर उपाय म्हणून अधिकाधिक प्रवाशांच्या सोयीच्या लोकल सोडणे आवश्यक असताना रेल्वे प्रशासन उलट महत्वाच्या लोकल बंद ठेऊन प्रवाशांची गैरसोय करत असल्याने प्रवासी नाराजी व्यक्त करत आहेत. मुंबईला जाणाऱ्या प्रवाशांची गर्दी वाढली आहे. त्यामुळे अशा लोकलची आता गरज आहे, असे प्रवासी सांगतात.

### लोकसभेची रणधुमाळी सुरु असतानाच महाराष्ट्रात पुन्हा एका निवडणुकीची घोषणा

या निवडणुकीसाठी अर्ज करण्याची शेवटची तारीख ही 22 मे 2024 असणार आहे. तसेच 24 मे 2024 ला सर्व अर्जांची छाननी होईल. तर 27 मे 2024 ही अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख असणार आहे. यानंतर 10 जून 2024 ला मतदान पार पडेल. तर 13 जून 2024 मतमोजणी केली जाईल. 18 जून 2020 पर्यंत ही निवडणूक प्रक्रिया पूर्ण झालेली असेल.काही महिन्यांपूर्वी पाच शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाची निवडणूक पार पडली तेव्हा नाशिक आणखी दोन जागांवर महाविकास आघाडी आणि महायुतीत चुरस बघायला मिळाली होती. नाशिकच्या जागेची चर चांगलीच चर्चा होती. यावरुन काँग्रेसमध्ये धुसफूस बघायला मिळाली होती. आता या निवडणुकीत काय-काय राजकीय घडामोडी घडतात? ते पाहणं महत्त्वाचं ठरेल.

### उल्हासनगरातील मध्यवर्ती रुग्णालयात रुग्णांना भेटण्यासाठी येणारे नातेवाईक रुग्णांना पुरवतात दारू, गांजा,गुटखा

या अंगझडतीत रुग्णांच्या नातेवाईकडे दारू, गांजा, गुटखा, तंबाखू आदी पदार्थ सापडत असल्याचे उघड झाले. काही रुग्णाच्या नातेवाईकडून अंतरवस्त्रात लपून आणलेल्या दारूच्या बॉटल रुग्णालय सुरक्षा रक्षकांनी जप्त केल्याने, एकच खळबळ उडाली.मध्यवर्ती रुग्णालयाचा फायदा सर्वसामान्य नागरिकांना मिळण्यासाठी रुग्णालय प्रशासनाकडून प्रयत्न केले जात आहे. मात्र याला काही रुग्णांचे नातेवाईक छेद देत असल्याचे डॉ मनोहर बनसोडे म्हणाले.

रविवारी रात्री असाच प्रकार उघड झाला असून रुग्णांच्या नातेवाईकडून अंतरवस्त्रात लपून ठेवण्यात आलेल्या दारूच्या बॉटल सुरक्षा रक्षकांनी जप्त केल्याची माहिती डॉ बनसोडे यांनी दिली. यापुढे रुग्णांच्या नातेवाईकसह संबंधितांवर कारवाईचे संकेत रुग्णालय प्रशासन यांनी दिले आहे. थेट रुग्णालयात नशेली प्रदार्थाची विक्री रुग्णांना होत असल्याने, मध्यवर्ती रुग्णालय चांगलेच चर्चेत आले आहे

# प्रचाराच्या धुरळ्यात पर्यावरण गायब

किस आणि विनाश यांना वेगळे ठेवायचे असेल तर पर्यावरणाचा मुद्दा 18व्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचारा दरम्यान अजेंड्यावर आणावा लागेल, अन्यथा आणखी पाच वर्षे वाट पाहावी लागेल. सध्या देशात निवडणुकीचे वातावरण आहे. प्रत्येक ठिकाणी राजकीय नेत्यांच्या भाषणाच्या बातम्या झळकत आहेत. त्यांच्या बोलण्याकडे, भाषणांकडे सर्वांचेच लक्ष आहे. विकासाबाबत मोठमोठे दावे प्रतिदावे केले जात आहेत. आश्वासनांचा पाऊस पाडला जात आहे. हेच मुद्दे मतदारांना आकर्षित करत आहेत. दुर्दैवाने या चर्चेत पर्यावरण, हवामान बदल आणि निसर्गाचा उल्लेख केला जात नाही. हवा, माती, जंगल, पाणी आदींवरून कोणीही बोलत नाही.लोकसभाच नाही तर विधानसभा, ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत देखील पर्यावरणसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांना स्थान दिले जात नाही. देश स्वतंत्र झाला तेव्हा देखील कदाचित पर्यावरण मुद्दा महत्त्वाचा वाटला नसावा. कारण त्या काळात आर्थिक आणि विकासाला प्राधान्य दिले गेले. दुष्काळ, शेतीतील कमी उत्पादन आणि बेरोजगारीसारख्या मुद्द्यांना महत्त्व दिले जात होते. परंतु आज आपला देश नाही तर संपूर्ण जग वेगाने बदलत असताना त्या मागचे कारण हे निसर्गातील बदलते ऋतूचक्र असताना त्या मुद्द्यांना महत्त्व न देणे राजकीय नेत्यांच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित करणारे आहे. निसर्ग आणि वातावरणाकडे दुर्लक्ष करणे निराशाजनक आहे. देशाचा पर्यावरण अहवाल हा निश्चितच चांगला नाही.* आज बंगळुरू यासह अनेक ठिकाणे निरंक होण्याच्या मार्गावर आहेत. बंगळुरूला भारताचे केपटाउन म्हटले जात आहे. दक्षिण आफ्रिकेतील या शहरात आज पाण्याचे ' रेशनिंग' झाले आहे. कर्नाटकात पाणीसाठा कमी होत तो आता 36 टक्के राहिला आहे. याचाच अर्थ हा उन्हाळा कर्नाटकला बरेच चटके देणारा राहू शकतो. तेलंगणातून देखील अशाच बातम्या आहेत. तेथेही तलावातील, धरणातील पाणी कमी होत आहे. सूर्य आग ओकत आहे आणि एकीकडे पाण्याची गरज वाढत असताना दुसरीकडे पाणीसाठा कमी होत आहे. महाराष्ट्रात देखील अशीच स्थिती आहे. आता राजस्थान, बिहार, उत्तर प्रदेशात सर्वेक्षण झालेले नाही.साहजिकच तेथे देखील कमी जास्त प्रमाणात असेच चित्र आहे. हिमालयातून येणार्या बातम्या देखील धक्कादायक आहेत. वाढत्या उष्णतेमुळे हिमकडे आणि हिमनद्या वितळत असून ते तलावाचे रूप धारण करत आहेत. त्याचे दोन दुष्परिणाम होतील. हे सरोवर नैसर्गिक आपत्तीला कारणीभूत ठरतील आणि नद्यांचे पाणी कमी होईल. आता



देशाच्या वातावरणाचा विचार करू. जागतिक आरोग्य संघटनेनुसार जगात भारतातील 80 शहरे प्रदूषणात आघाडीवर आहेत. त्याचवेळी देशाची राजधानीही जगातील सर्वात प्रदूषित राजधानींपैकी एक आहे. यावरून अन्य शहरांच्या स्थितीचे आकलन करता येईल. प्रत्येक क्षणाला ज्या वातावरणात श्वास घेतो ते वातावरण प्रचंड प्रमाणात प्रदूषित झाले आहे आणि असे असताना आपल्या राष्ट्रीय अजेंड्यात विशेषतः कोणत्याही राजकीय पक्षांसाठी हा चिंतेचा विषय नसणे हे धक्कादायक आहे. कोणत्याच पक्षाच्या जाहीरनाम्यात पर्यावरण वाचविण्याबाबत कोणताच उल्लेख नाही. याबाबत प्रश्न विचारायला हवेत.आता पाहा हवा, पाणी, माती हे जीवनदायी स्रोत उपलब्ध करून देणार्या जंगलांची स्थिती बिकट आहे. बिहारमध्ये सात ते आठ टक्के जंगल राहिले आहे. पश्चिम बंगालमध्ये हा आकडा 13 ते 14 टक्के आहे. अर्थात तो 33 टक्के असणे अपेक्षित आहे. जाहीरनाम्यात याचा कोठेच उल्लेख दिसत नाही. असे का होते? आपले राजकीय पक्ष या मुद्द्यांकडे इतक्या असंवेदनशील नजरेने का पाहतात? याचे विश्लेषण करायला हवे. आपण राजकीय पक्ष किंवा नेत्यांची आश्वासने किंवा जाहीरनामे पाहिले तर त्यात विकासाचाच उल्लेख केला जातो. कारण त्यावरच मोठी रणनीती अवलंबून असते. वास्तविक हा त्यांचा विचार नसतो, उलट आपणच तसे त्यांना बोलायला भाग पाडतो. लोकांना जे आवडते, तेच नेते करत असतात. त्यांनी आपली नस पकडलेली आहे आणि ते आपल्याला चांगलेच ओळखून असतात.आता लोकांचा प्राधान्यक्रम हा विकासावर केंद्रित असेल तर साहजिकच राजकीय पक्ष आणि नेते देखील आपल्या भाषणात विकासाचा मुद्दा केंद्रस्थानी ठेवतील. आतापर्यंतच्या निवडणुकीच्या इतिहासात निसर्ग, पर्यावरण आणि वातावरणावर कधी चर्चा झाल्याचे पाहिले आहे का? पर्यावरणाच्या मुद्द्यावर निवडणूक लढली गेली आहे का ? या प्रश्नांचे उत्तर नकारार्थी असेल तर राजकीय पक्षांपेक्षा आपणच त्यावर अधिक विचार करणे गरजेचे आहे. कारण राजकीय पक्ष सत्तेवर आल्यानंतर जे काही घडते, ते आपल्यासमोर असते आणि ते अनुभव चांगले वाईट, गोड कटू असे सर्व प्रकारचे असू शकतात. मात्र याशिवाय सर्वात कळीचा मुद्दा म्हणजे आयुष्याचा.याभोवती निसर्ग चोवीस तास असतो. मानवी जीवन हे चांगली हवा, माती, जंगल आणि पाण्यावर अवलंबून आहे. म्हणूनच देशाच्या उभारणीत केवळ विकासाच्याच मुद्द्याचा डंका नको तर पक्षांनी आणि नेत्यांच्या भाषणांत हवा, नदी, जंगल, मातीचा देखील उल्लेख असायला हवा. या आधारावर पाच वर्षांनंतर त्यांच्या दाव्याचे आणि कामाचे रिपोर्ट कार्ड तयार होईल तेव्हा त्यांनी पर्यावरण, पाणी, जंगल, मातीच्या संरक्षणासाठी काय काय केले, याचाही लेखाजोखा मांडला जाईल. आपण कधीही या मुद्द्यावर रान उठविले नाही. म्हणून संपूर्ण दोष राजकीय पक्षांच्या माथी मारता येणार नाही आणि यासाठी आपणही दोषी आहोत आणि ते मान्य केले पाहिजे.आपण कधीही पर्यावरणाचा मुद्दा हा मतांच्या दृष्टिकोनातून समोरआणला नाही आणि या कारणांमुळेच राजकीय पक्षांच्या जाहीरनाम्यात हे मुद्दे कधीच दिसून आले नाहीत. आजघडीला सर्व वेगाने गोष्टी हातातून निसटत असून त्यावर राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चा होताना तसेच जंगल, पाणी, नदी, माती गायब होत असताना देशातील प्रत्येक गावात हाच मुद्दा केंद्रस्थानी असणे अपेक्षित आहे. एकदा या मुद्द्याला निवडणुकीचा मुद्दा म्हणून सिद्ध केले तर पुढील पाच वर्षांत वातावरण सुरक्षित राहण्याबाबत थोडीफार आशा व्यक्त करता येऊ शकते. त्याचबरोबर काही राजकीय पक्षांना देखील या गोष्टीसाठी जबाबदार धरू शकतो आणि निकोप लोकशाहीमध्ये अशीच व्यवस्था अपेक्षित असते. अन्यथा राजकीय पक्षांना दोष देण्यात अर्थ नाही. कारण ज्या मुद्द्यावर निवडणुका लढल्या जातात, ते मुद्दे आपणच ठरवलेले असतात. त्यामुळे जीव वाचवायचा असेल आणि आगामी पिढी वाचवायची असेल तर पर्यावरणाला राजकीय मुद्दा करण्यापासून कोणीही मागे हटू नये.

# हिमोफिलिया बी' ग्रस्त निशांत 'टोटल हीप रिप्लेसमेंट' शस्त्रक्रियेनंतर परतला साहसी

कॅनडाच्या नयनरम्य नैसर्गिक स्थळांच्या साहसी सफरीला गेलेल्या निशांत याच्या प्रवासात 'हीप आर्थरायटीस'मुळे अडथळा निर्माण झाला होता. परिणामी हायकिंग, स्कुबा डायव्हिंग आणि पर्वतारोहण यासारख्या त्याच्या आवडत्या गतीविधीमध्ये कंबरेतील असह्य वेदनांमुळे बाधा आली होती. त्यावर उपचारासाठी कॅनडा आणि मुंबईतील असंख्य वैद्यकीय तज्ज्ञांशी सल्लामसलत करूनही श्री. निशांत यांच्या प्रकृतीत सुधारणा झाली नाही.₹आयुष्यात आलेली आव्हाने आपण कसे आहोत हे सांगत नाहीत, तर तुम्ही त्या आव्हानांचा सामना करून त्यावर मात कशी करता, ते महत्त्वाचे आहे,₹ अशी टिप्पणी वोक्हार्ट हॉस्पिटलमधील 'टोटल हिप रिप्लेसमेंट' शस्त्रक्रियेतील आपल्या कौशल्यासाठी प्रसिद्ध असलेले प्रतिष्ठित ऑर्थोपेडिक शल्यतज्ज्ञ डॉ. सुप्रित बाजवा यांनी केली होती. परंतु, त्यांना माहिती नव्हते की आपले शब्द लवकरच निशांत याच्या प्रकृती स्वास्थ्याच्या प्रवासात पुन्हा पुन्हा गुंजणार आहेत.आपले पूर्वाश्रमीचे हसते खेळते आयुष्य पुन्हा मिळवण्यासाठी, प्रकृतीच्या तक्रारीवर उपाय शोधण्यासाठी आणि आराम मिळावा म्हणून श्री. निशांत हे डॉ. सुप्रीत बाजवा यांच्याकडे आले. तथापि, शस्त्रक्रिया करण्याआधी करावयाच्या चाचण्यांदरम्यान श्री. निशांत यांना रक्त गोठवण्याची क्षमता नाहीसे करणारा 'हिमोफिलिया बी' विकार असल्याचे निदान झाले. यामुळे शस्त्रक्रिया करणाऱ्या वैद्यकीय चमूसमोर नवीन आव्हान उभे ठाकले आणि शस्त्रक्रिया करतेवेळी रक्तस्राव वाढल्यास तसेच त्यानंतरच्या प्रकृती स्वास्थ्याबद्दल काळजी वाटू लागली होती.निशांत याच्यावरील शस्त्रक्रिया प्रचंड गुंतागुंतीची असूनही डॉ. सूप्रित बाजवा यांनी न घाबरता वोक्हार्ट हॉस्पिटल्स मुंबई सेंट्रल येथील हेमॅटोलॉजिस्ट आणि बीएमटी फिजिशियन डॉ. मुरलीधरन सी. यांचे सहकार्य घेतले. दोघांनी मिळून श्री. निशांत याच्या शरीरात गुठळ्या निर्माण करणारे घटक तयार करण्यासाठी एक सूक्ष्म योजना आखली, शस्त्रक्रिया करतेवेळी आणि नंतर होणाऱ्या रक्तस्रावाचा धोका कमी करण्यासाठी निशांत याच्या स्थितीवर पुरेसे नियंत्रण सुनिश्चित केले.या रणनीतीच्या साह्याने डॉ. सूप्रीत बाजवा यांनी 'डायरेक्ट अँटेरियर ॲप्रोच (DAA)' तंत्राचा वापर करून 'टोटल हिप रिप्लेसमेंट' शस्त्रक्रिया पुढे नेली. इथे 'डीएए' तंत्राबद्दल माहिती अशी की, हे तंत्र स्नायू सुरक्षिततताविषयक फायदे आणि पारंपरिक पद्धतीच्या तुलनेत रक्तस्राव कमी करण्यासाठी ओळखले जाते. अचूकता आणि कौशल्याने मार्गदर्शन करून डॉ. सुप्रित बाजवा यांनी श्री. निशांत याच्या असामान्य वैद्यकीय परिस्थितीमुळे उद्भवलेल्या शस्त्रक्रियेच्या आव्हानांची हाताळणी करत इष्ट परिणामांची खात्री केली.शस्त्रक्रियेनंतर श्री. निशांत याच्या प्रकृतीत उल्लेखनीय सुधारणा दिसून आली. दृढनिश्चयाने बदल स्वीकारून डॉ. बाजवा यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. निशांत यांनी आपली तब्येत पूर्वपदावर आणण्याच्या पद्धतीमध्ये योगाचा समावेश केला. येणाऱ्या प्रत्येक दिवसाबरोबर श्री. निशांत यांनी लवचिकता आणि समर्पित भावना दाखवली, पुन्हा पूर्वीसारखे आयुष्य जगण्यासाठी आणि आपल्या साहसी खेळांकडे परतण्यासाठी प्रयत्न केले.काही महिन्यानंतर श्री. निशांत याच्या प्रकृतीत झालेला बदल विलक्षणतेशिवाय कमी नव्हता. 'हिप आर्थरायटीस'च्या त्रासातून मुक्त होऊन त्यांनी नव्या जोमाने नव्या साहसांकडे झेप घेतली. आपल्या रुग्णांच्या आरोग्यासाठी अतुलनीय बांधिलकी दाखवणाऱ्या डॉ. बाजवा यांनी श्री. निशांत यांच्या यशस्वी प्रकृती सुधारणेत आणि सक्रिय जीवनशैलीकडे परत जाण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.₹संकटाचा सामना करताना आणि बरे होण्याच्या प्रयत्नात स्थिर राहणे आवश्यक आहे,₹ यावर डॉ. बाजवा यांनी जोर दिला. ₹प्रत्येक आव्हान प्रगतीसाठी, आनंदासाठी संधी प्रदान करते, असेही ते म्हणाले. ₹बरे होण्याच्या प्रवासात सहकार्य महत्त्वाचे आहे. श्री. निशांत यांच्यासारख्या अनोख्या वैद्यकीय आव्हानांना सामोरे जाताना विविध क्षेत्रातील तज्ज्ञांनी एकत्र येणे, त्यांनी आपले कौशल्य सामायिक करणे आणि एक अनुकूल दृष्टिकोन तयार करणे महत्त्वाचे आहे. आमचे ज्ञान आणि संसाधने एकत्रित करून, प्रत्येक रुग्णाला त्यांच्या आवश्यकतेनुसार सर्वसमावेशक उपचार मिळतील याची खात्री करून आम्ही गुंतागुंतीच्या आरोग्यविषयक तक्रारीत दिशादर्शन करू शकतो आणि यशस्वी परिणाम येतील असा मार्ग मोकळा करू शकतो,₹ असे वोक्हार्ट हॉस्पिटल्स मुंबई सेंट्रल येथील हेमॅटोलॉजिस्ट आणि बीएमटी फिजिशियन डॉ. मुरलीधरन सी. म्हणाले.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# डोंबिवलीत घरफोड्या करणाऱ्या दोन सराईत चोरट्यांना पोलिसांनी उत्तर प्रदेशातून केली अटक



डोंबिवली - डोंबिवलीत एका नामांकित डॉक्टरच्या बंद घरात खिडकीचे ग्रील तोडून घरात घुसून चोरटे घरातील वस्तू दागिने चोरी करुन पसार झाले होते. काही महिन्यांपूर्वी ही घटना घडली होती. इतकंच नाही तर डोंबिवलीत अनेक घरफोड्या झाल्या होत्या. त्यामध्ये चोरी करण्याची पद्धत एकसारखीच होती. चोरटे घराचे ग्रील तोडून आत शिरायचे. घरातील दागदागिन्यांवर डल्ला मारुन पसार व्हायचे. डोंबिवलीचे एसीपी सुनिल कुऱ्हाडे आणि वरिष्ठ पोलिस निरिक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनखाली पोलिस अधिकारी संपत फडोळ आणि राहुल म्हस्के यांच्या पथकाने या चोरट्याचा शोध सुरु केला होता. आता या चोरट्यांना अटक करण्यात आली आहे.

२४ गुन्ह्यांची करण्यात आली उकल

राजेश कहार आणि चिंटू या दोघांकडून २३ लाख रुपये किंमतीचा ऐवज पोलिसांनी जप्त केला आहे. त्यांच्याकडून २४ गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा पुढील तपास सुरु केला आहे.

## पोलिसांची उत्तर प्रदेशात जाऊन कारवाई

पोलिसांनी जेव्हा सगळी माहिती काढून तपास सुरु केला तेव्हा हे दोन घरफोडी करणारे चोरटे उत्तर प्रदेशातील सिद्धार्थनगर येथील एका गावात राहत असल्याची माहिती मिळाली. मानपाडा पोलिस ठाण्याची दोन पोलीस पथके उत्तर प्रदेशात पोहचली. स्थानिक पोलिसांच्या मदतीने पोलीस पथकाने माहिती मिळालेल्या एका घरावर रात्री एक वाजताच्या सुमारास छापा टाकला. त्या घरातून राजेश कहार याला अटक करण्यात आली. राजेश याने दिलेल्या माहितीनुसार चिंटूच्या घरी देखील पोलिसांनी तासाभरात छापा टाकला. या दोघांच्या घरांतून लुटलेले दागिने जप्त करण्यात आले आहेत. या दोन्ही चोरट्यांनी गावात आलिशान घरं बांधली आहेत.

# नरेंद्र मोदी आणि राज ठाकरे यांच्या सभांच्या नियोजनासाठी महायुतीची विशेष बैठक संपन्न





कल्याण : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची १५ मे रोजी कल्याण येथे जाहीर सभा होणार असून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची १२ मे रोजी कळवा येथे जाहीर सभा होणार आहे. या दोन्ही सभांच्या नियोजनासाठी आज महायुतीची बैठक डोंबिवली येथे संपन्न झाली. या बैठकीला महायुतीच्या घटकपक्षांचे प्रमुख नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची येत्या १५ मे रोजी कल्याण पश्चिमेच्या व्हर्टेक्स मैदानावर जाहीर सभा होणार आहे. कल्याण आणि भिवंडी लोकसभेसाठी ही सभा होणार असून या सभेच्या तयारीसाठी महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते तयारीला लागले आहेत. मोदींच्या सभेला जास्तीत जास्त कार्यकर्ते आणि नागरिक यावेत, यासाठी महायुतीच्या सर्वच पक्षांकडून पूर्वतयारी सुरू करण्यात आली आहे. तर दुसरीकडे १२ मे रोजी कळव्याच्या खारेगाव येथील ९० फुटी रस्त्यावर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची जाहीर सभा होणार आहे. ठाणे आणि कल्याण लोकसभा मतदारसंघांसाठी होत असलेल्या या सभेचीही महायुतीच्या सर्वच पक्षांकडून तयारी सुरू करण्यात आली आहे.

या दोन्ही सभांच्या अनुषंगाने महायुतीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधण्यासाठी आज डोंबिवली येथे महत्वपूर्ण नियोजन बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, मनसेचे आमदार राजू पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष नाना सूर्यवंशी, लोकसभा निरीक्षक शशिकांत कांबळे, रिपाइंचे जिल्हाध्यक्ष प्रल्हाद जाधव, राष्ट्रवादी काँग्रेसचे अर्जुन नायर यांच्यासह महायुतीतील घटक पक्ष आणि मित्र पक्षांचे सर्वच प्रमुख पदाधिकारी लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

कल्याण लोकसभेत मागील काही दिवसात प्रचार करत असताना लोकांचा खूप चांगला प्रतिसाद मिळत असून सगळीकडे जिवंतपणा अनुभवायला मिळत आहे. त्यामुळेच या दोन्ही सभांनाही मोठा प्रतिसाद मिळेल, आणि कल्याण लोकसभेची जागा विक्रमी मताधिक्याने निवडून येईल, असा विश्वास याप्रसंगी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी व्यक्त केला.

# २३ वर्षांच्या पाणी टंचाईच्या संघर्षाला ठाण्यातील गृहसंस्थेने दिली मात

## पाण्याच्या साठवणूकीचे केले यशस्वी नियोजन



ठाणे : गेली अनेक वर्ष लोकमान्य नगर येथील लक्ष्मी पार्क गृहसंकुलातील फेज एक मधील सप्रेम या इमारतीतील रहिवाशांना पाणी टंचाईच्या समस्येला सामोरे जावे लागत होते. पाण्याच्या समस्येमुळे रहिवाशी हैराण झाले होते. अखेर गृहसंस्थेतील सभासद आणि सदस्यांनी एक बैठक घेतली आणि उपाययोजना करण्यासाठी विविध कल्पना सूचविल्या. पावसाच्या पाण्याची आणि वातानूकुलीत (एसी) यंत्रांतून निघणारे पाणी साठवून या रहिवाशांनी गृहसंस्थांना वेगळा आदर्श घालून दिला आहे.

लोकमान्य नगर येथे लक्ष्मी पार्क गृहनिर्माण संस्था आहे. या गृहसंस्थेत फेज एक मध्ये सप्रेम को-ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी ही सात मजली इमारत आहे. इमारतीमध्ये ६४ सदनिका आहेत. १९९७ मध्ये या इमारतीची नोंदणी झाली आहे. ठाणे महापालिके मार्फत या इमारतीला पाणी पुरवठा होतो. परंतु पाण्याच्या वेळा ठराविक असल्याने रहिवाशी हैराण झाले होते. अनेकदा एक – दोन दिवस पाणी आले नाही, तर नागरिकांचे हाल होत असे. उन्हाळ्यात दररोज दोन टँकर मागविण्याची वेळ रहिवाशांवर येत होती. त्यामुळे पाण्याचे देयकही वाढत होते.

२०१९ मध्ये गृहसंकुलातील सदस्यांनी येथील स्थानिक माजी नगरसेवक हनुमंत जगदाळे यांच्या मदतीने बोअरवेल खणली. येथे ३५० फूट खोलावर पाणी लागले. परंतु हे पाणी किती दिवस टिकणार हा मोठा प्रश्न होता. त्यामुळे इमारतीतील संस्थेचे पदाधिकारी अविनाश शालीग्राम, किशोर नायर, सुरेश कदम, अरुण देशमुख यांच्यासह इतर पदाधिकारी आणि सदस्यांनी एक बैठक घेतली. या बैठकीत पावसाचे पाणी साठविण्याचा निर्णय घेण्यात आला. इमारतीच्या गच्चीवर शेड बांधण्यात आले होते. पावसाचे पाणी शेडमधून गटारात जात होते. त्यामुळे हे पाणी त्यांनी एका जल वाहिनीच्या मदतीने बोअरिंग टाकीमध्ये टाकले. त्यामुळे दोन वर्षांत पावसाच्या पाण्याची मोठ्याप्रमाणात साठवणूक झाली आहे.

# बदलापूर, अंबरनाथकरांना अखंडित वीजपुरवठा



बदलापूर : बदलापूर, अंबरनाथ मध्ये सारखी वीज पुरवठा खंडित होत असल्याने स्थानिकांना त्याचा त्रास सहन करावा लागत होता. परंतु आता वडवली आणि आंबेशिव उच्चदाब वाहिन्यांमधून वीजपुरवठ्याला सुरुवात करण्यात आली आहे. महापारेषणच्या २२०/२२ केव्ही जांभूळ अतिउच्चदाब उपकेंद्राचा पहिला टप्पा ४ मे रोजी कार्यान्वित केला आहे. यामध्ये ५० एमव्हीए क्षमतेचा पहिला ट्रान्स्फॉर्मर कार्यान्वित झाला आहे.

त्यामुळे वडवली व आंबेशिव या दोन २२ केव्ही उच्चदाब वाहिन्यांमधून सुरळीतपणे वीजपुरवठा सुरू करण्यात यश आले आहे. परिणामी महापारेषणच्या मोरिवली उपकेंद्रावरील भार कमी होऊन महावितरणच्या बदलापूर, अंबरनाथ, कानसई आणि कात्रपमधील ग्राहकांना दिलासा मिळाला आहे.

जांभूळ उपकेंद्रात ५० एमव्हीए क्षमतेचे दोन ट्रान्स्फॉर्मर बसवण्यात येणार आहेत. यातील पहिला ट्रान्स्फॉर्मर शनिवारी कार्यान्वित केला आहे. या उपकेंद्रातून निघणाऱ्या चारपैकी वडवली आणि आंबेशिव या उच्चदाब वीजवाहिन्या ही शनिवारीच कार्यान्वित करण्यात आल्या. परिणामी या भागाला वीजपुरवठा करणाऱ्या मोरिवली उपकेंद्रातील भार आता कमी झाला. मोरिवली उपकेंद्रावरील भार कमी झाल्यामुळे विजेच्या अधिक मागणीच्या कालावधीत बदलापूर, अंबरनाथ, कानसई आणि कात्रप परिसरातील ग्राहकांचा बाधित होणारा वीजपुरवठा यापुढे सुरळीतपणे सुरू राहणार आहे.

# दिग्गज नेत्यांच्या सभांनी कल्याण डोंबिवली गाजणार



कल्याण : लोकसभेच्या चौथ्या टप्प्यातील निवडणूक जवळ येऊ लागली आहे, तसतसे राजकीय वातावरण तापू लागले आहे. कल्याण लोकसभेत मुख्यमंत्री शिंदे यांचे चिरंजीव श्रीकांत हे उमेदवार असून येथे शिंदे व ठाकरे गटात लढत होत आहे. तर भिवंडी मतदारसंघात कपिल पाटील यांच्याविरोधात राष्ट्रवादी शरद पवार गटाचे सुरेश म्हात्रे हे उभे असून तेथे तिहेरी लढत होणार आहे.

मुख्यमंत्री शिंदे यांचे सुपुत्र व केंद्रीय राज्यमंत्री पाटील हे दोघेही आपली हॅट्रिकसाठी झटत असून या मतदारसंघाना महत्व आले आहे. महायुती व महाविकास आघाडीतील पंतप्रधान नरेंद्र मोदी, शरद पवार, राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे बडे नेते या उमेदवारांच्या प्रचार सभांसाठी पुढील आठवड्यात कल्याण डोंबिवलीत असून निवडणूकीचे रणांगण दणाणून सोडणार आहेत. ठाणे जिल्ह्यातील कल्याण आणि भिवंडी लोकसभेत महाविकास आघाडी व महायुतीचे उमेदवार यांच्यात तुल्यबळ लढत होणार आहे. उमेदवारांच्या प्रचार सभांसाठी ददिग्गज नेते मंडळी पुढील आठवड्यात कल्याण डोंबिवलीच्या दौऱ्यावर आहेत.

# आनंद दिघेंच आनंद आश्रमच मुख्यमंत्री शिंदेंनी हडपला, राऊतांचा थेट आरोप



ठाणे - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आनंद दिघे यांच्या निधनानंतर उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या संपत्तीबाबत विचारले असल्याचा आरोप केला होता. त्या आरोपाला प्रत्युत्तर शिवसेना नेते संजय राऊत यांनी दिले. आनंद दिघे यांची खरी संपत्ती असलेला आनंद आश्रमच मुख्यमंत्री शिंदे यांनी हडपल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला.

ठाणे लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे शिवसेना उमेदवार राजन विचारे यांच्या प्रचारसभेत मंगळवारी (ता. ७) ते बोलत होते. नरेंद्र मोदी हे नकली फकीर असून खरे फकीर हे आनंद दिघे होते, असेही राऊत यांनी यावेळी सांगितले. आनंद दिघे यांनी गद्दारांना क्षमा नाही, असे म्हटले होते. हा विचार ४ जूननंतर ठाण्यात अमलात आणायचा असल्याचा घणाघातदेखील राऊत यांनी केला. तसेच आनंद दिघे यांच्यावर आधारित तयार केलेला खोटा चित्रपट हा त्यांचा अपमान आहे. ठाणेकर अशा व्यक्तींना माफ करणार नाहीत, असेही राऊत यांनी म्हटले.

राज्यात दोन ठिकाणी प्रचार करण्याची गरज नाही. एक ठाणे आणि दुसरे बारामती. येथे प्रचार करण्याचा प्रश्नच येत नाही. येथील घटनाबाह्य मुख्यमंत्री मोदींच्या सहवासात गेल्यापासून खोटं बोलायचे, रेटून बोलायचे, असे वागत आहेत. मुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांच्या मुलाला ठाण्यातच उभे करायला पाहिजे होते. ज्या-ज्या ठिकाणी चोरलेला धनुष्यबाण आहे तिथे मशालच विजयी होणार असून चोरीचा माल पचणार नसल्याची टीकाही त्यांनी केली.

ब्रिटिशांनी लुटला नसेल एवढा देश या लोकांनी दहा वर्षांत लुटला आहे. कोल्हापूर येथे छत्रपती शाहू महाराज यांचा पराभव व्हावा, म्हणून मुख्यमंत्री पैसे वाटत होते. कोल्हापूरच्या एका हॉटेलमध्ये मुख्यमंत्री शंभर कोटी घेऊन बसले होते, असा गंभीर आरोपही संजय राऊत यांनी केला. दरम्यान, भाजप देशात दीडशे पण जागा पार करू शकत नाही. इंडिया आघाडीच्या देशात ३२० हून अधिक जागा निवडून येण्याचा विश्वास संजय राऊत यांनी व्यक्त केला.

# नकली नोटांचा भांडाफोड, १३ हजारांच्या नकली नोटा ताब्यात



कल्याण : किरकोळ विक्रेत्यांना नकली नोटा देऊन त्या चलनात आणणाऱ्या एका तरुणाला कल्याणच्या महात्मा फुले पोलिसांनी अटक केली आहे. अंकुश सिंह असे या आरोपीचे नाव असून तो दिल्लीत रॅपिडो बाईक चालवितो. तो मुंबईत आपल्या नातेवाईकाकडे आला होता. पुन्हा दिल्लीकडे परतीचा प्रवास करत असताना कल्याण स्टेशनवर एका केळी विक्रेत्याकडून केळी घेऊन नकली नोट दिल्याने केळी विक्रेत्याने हा प्रकार उघडकीस आणला. त्याने कल्याण महात्मा फुले पोलिसांना माहिती दिली.

कल्याणच्या महात्मा फुले पोलिसांनी आरोपी अंकुश सिंगला ताब्यात घेत त्याच्यावर गुन्हा दाखल करत त्याच्याकडून १३ हजारांच्या नकली नोटा पोलिसांनी जप्त केल्या आहेत. त्यात १००, २०० आणि ५०० रुपयांच्या नकली नोटांचा समावेश आहे. पोलिसांच्या माहितीनुसार अंकुश सिंह याला या नकली नोटा बाजारात चालवण्यासाठी दिल्या होत्या. त्या नंतर त्याला कमिशन काढून पुढे मोठ्या प्रमाणात बाजारात नकली नोटा चालवण्यासाठी देणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या प्रकरणात कल्याण महात्मा फुले पोलीस आणि एनआयए यामागे मूळ सूत्रधार कोण याचा शोध घेत असल्याची माहिती महात्मा फुले चौक पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेश साळवी यांनी दिली.

# आगरी कोळींची कुलदेवी वज्रेश्वरी मातेच्या यात्रा उत्सवास प्रारंभ



भिवंडी : महाराष्ट्रातील लाखो आगरी, कोळी, भंडारी, कुणबी यांची कुलदेवी असलेल्या आणि नवसाला पावणारी देवी अशी ख्याती असलेल्या वज्रेश्वरीतील वज्राई मातेचा यात्रा महोत्सव मोठ्या दिमाखात संपन्न होत आहे. यात्रेसाठी आणि नवस फेडण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून लाखो भाविकांची गर्दी होत असते. मंगळवार सात कृष्ण चतुदर्शी ते १० मे वैशाख शुद्ध प्रतिपदा या कालावधीत उत्सव संपन्न होत आहे.तर वैशाख शुद्ध प्रतिपदा गुरुवार ९ मे रोजी देचीचा मुख्य आकर्षण सोहळा असलेला पालखी सोहळा रात्री १२ वाजता संपन्न होणार आहे.

वज्रेश्वरी देवीच्या यात्रेचे विशेष म्हणजे राज्यातील बहुतांश देवीच्या यात्रा या पौर्मिमेला असतात पण वज्रेश्वरीची यात्रा ही अमावसेला असते. यात्रेसाठी मुंबई, ठाणे, नाशिक, रायगड येथून आणि शेजारील राज्यातूनही मोठ्या प्रमाणात भाविक दर्शनासाठी आणि नवस फेडण्यासाठी येत असतात. यात्रेसाठी वज्रेश्वरी देवी मंदिर प्रशासन पूर्णपणे सज्ज असल्याची माहिती देवी संस्थान यांनी दिली तर आलेल्या भाविकांना व्यापाऱ्यांना सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे ग्रामपंचायत वज्रेश्वरीचे सरपंच रमेश शेळक यांनी सांगितले.

■ वज्रेश्वरी देवीच्या यात्रेत कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी गणेशपुरी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक धर्मराज सोनके यांनी वज्रेश्वरी ग्रामपंचायत पदाधिकारी,मंदिर प्रशासन,शांतता कमिटी सदस्य,पत्रकार यांच्या उपस्थितीत एक बैठक घेऊन सर्व प्रकारचा आढावा घेऊन माहिती घेतली आणि मार्गदर्शन करून यात्रा परिसर आणि मंदिर,पालखी मार्ग या ठिकाणी जाऊन पाहणी करून मार्गदर्शन केले. पाच अधिकारी, तीस कर्मचारी यांचे एक प्लातून आणि स्थानिक पोलीस 25 असे एकूण साठ पोलिस कर्मचारी वृंद, वाहतूक व्यवस्था,सीसीटीवी 24 तास चालू राहणार, यात्रा सीसीटीवी देखरेखेखाली राहील, अशी माहिती गणेशपुरी पोलिस ठाणे चे सहायक पोलीस निरीक्षक धर्मराज सोनके यांनी दिली आहे.

# नरेंद्र मोदी आणि राज ठाकरे यांच्या सभांच्या नियोजनासाठी महायुतीची विशेष बैठक संपन्न

## डोंबिवलीत महाविकास आघाडीचा मेळावा पार पडला

कल्याण : कल्याण लोकसभेत कुठलाच विकास झाला नाही, यांच्याकडून फक्त बॅनरबाजी केली जात आहे. हे फक्त नागरिकांना फसवायचं काम असल्याची टिका महाविकास आघाडीच्या उमेदवार वैशाली दरेकर यांनी डॉ. श्रीकांत शिंदे यांच्यावर केली. आम्हाला लोकांचा प्रचंड प्रतिसाद मिळत असून या वेळेला लोकांना परिवर्तन हवं त्यासाठी लोक उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या मशालीला मतदान करणार असल्याचा विश्वास देखील दरेकर यांनी व्यक्त केला.

कल्याण शीळ रोड वरील पाटीदार भवन येथे महाविकास आघाडीचा मेळावा पार पडला. यावेळी उबाठा गटाचे कल्याण लोकसभा संपर्क प्रमुख गुरुनाथ खोत, जिल्हा प्रमुख सदानंद थरवळ, राष्ट्रवादीचे प्रवक्ते महेश तपासे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन पोटे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष वंडार पाटील, शिवसेना उबाठा गटाचे उपजिल्हा प्रमुख हर्षवर्धन पालांडे, रमेश जाधव, शहर प्रमुख शरद पाटील, धनंजय बोडारे, आरपीआय निकाळजे गटाचे जिल्हाध्यक्ष धर्मा वक्ते, आपचे जिल्हाध्यक्ष धनंजय जोगदंड, माजी नगरसेवक संतोष केणे, महिला काँग्रेस जिल्हाध्यक्षा कांचन कुलकर्णी आदी इंडिया आघाडीचे घटक पक्षाचे पदाधिकारी महिला व पुरुष कार्यकर्ते उपस्थित होते.




या मेळाव्यात कल्याण लोकसभा महाविकास आघाडीच्या उमेदवार वैशाली दरेकर यांच्या प्रचारासाठी लोकांसमोर नेमके काय मुद्दे घेऊन जावे या विषयावरती नेतेमंडळी व कार्यकर्त्यात मोठ्या प्रमाणात चर्चा झाली. यादरम्यान कार्यकर्त्यांना संबोधित करताना वैशाली दरेकर यांनी शिंदे यांच्यावर जोरदार टीका केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दत्तक घेतलेले गावात पाणी नाही आज ही गावातल्या महिलांच्या डोक्यावरचा हंडा गेला नाही, महिला तळयाच्या पाण्यात कपडे धुवतात.

# मागील दहा वर्षात थकबाकीदारांच्या जप्त मालमत्तांकडे खरेदीदारांची पाठ



कल्याण : कल्याण डोंबिवली पालिकेच्या मालमत्ता कर विभागाने गेल्या दहा वर्षाच्या कालावधीत लाखो रुपयांच्या मालमत्ता कराची थकबाकी असलेल्या मालमत्ता कर थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त केल्या आहेत. या मालमत्तांचे विहित प्रक्रिया पूर्ण करून लिलाव जाहीर केले होते. कोट्यवधी रूपये पालिकेला या लिलावातून मिळणार होते. परंतु, गेल्या दहा वर्षाच्या कालावधीत अशाप्रकारे जाहीर करण्यात आलेल्या लिलाव बोलीतील एकाही थकबाकीदाराची मालमत्ता विकली गेली नसल्याची पालिकेच्या अभिलेखातील धक्कादायक माहिती माहिती अधिकारातून उघडकीला आली आहे.

मालमत्ता कर थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करायच्या असतील तर त्यासाठी पालिकेचा मालमत्ता कर विभाग संबंधिताला पहिले नोटिसा पाठवून थकीत रक्कम भरणा करण्याचे सूचित करतो. अशाप्रकारे तीन नोटिसा पाठविल्यानंतर संबंधित थकबाकीदाराने मालमत्ता कर थकबाकी भरणा केली नाही तर पालिका त्या मालमत्ता जप्त करते. अशा अनेक थकबाकीदारांच्या कोट्यवधी रुपयांच्या मालमत्ता जप्त केल्यानंतर पालिका प्रसिध्द वर्तमानपत्रात या थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त केल्याची आणि त्यांचा लिलाव जाहीर करते. या जाहिरातींसाठी पालिका लाखो रुपये खर्च करते. या मालमत्ता नागरिकांनी खरेदी कराव्यात म्हणून जनजागृती करते. मालमत्ता विक्रीला न गेल्याने पालिकेने खर्च केलेला सगळा पैसा फुकट जातो, असे माहिती कार्यकर्ते मनोज कुलकर्णी यांनी सांगितले.

मागील १५ ते २० वर्षाच्या काळात थकबाकीदार कर मालमत्ताधारकांकडे पालिकेची सुमारे पंधराशे कोटीहून अधिकची रक्कम होती. या रकमा वेळोवेळी पालिकेने अभय योजना, विविध प्रकारच्या क्लृप्त्या करून थकबाकीदारांकडून वसूल केली आहे.

# रोहितला विश्रांतीची गरज!




## सातत्याने क्रिकेट खेळून दमल्याने फलंदाजीवर परिणाम; मायकल क्लार्कचे मत

मुंबई : रोहित शर्माच्या गेल्या काही 'आयपीएल' सामन्यांतील निराशाजनक कामगिरीबाबत फारशी चिंता करण्याची आवश्यकता नसली, तरी आगामी ट्वेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेकडे पाहता त्याने विश्रांती घेण्याचा नक्कीच विचार केला पाहिजे. तो आता दमलेला दिसत असून याचा त्याच्या फलंदाजीवर परिणाम होत असल्याचे मत ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार मायकल क्लार्कने व्यक्त केले.

पुढील महिन्यात अमेरिका आणि वेस्ट इंडिजमध्ये होणाऱ्या ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेत ३७ वर्षीय रोहित भारतीय संघाचे नेतृत्व करणार आहे. सध्या तो 'आयपीएल'मध्ये मुंबई इंडियन्स संघाचे प्रतिनिधित्व करत आहे. या स्पर्धेतील गेल्या पाचपैकी चार सामन्यांत तो एकेरी धावसंख्येवर बाद झाला. त्यामुळे त्याच्या कामगिरीबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

या वर्षाच्या सुरुवातीपासून रोहित सातत्याने क्रिकेट खेळत आहे.

'आयपीएल'पूर्वी तो इंग्लंडविरुद्ध पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत खेळला होता. या मालिकेत चांगली कामगिरी केल्यानंतर त्याने 'आयपीएल'च्या सुरुवातीला सातत्याने धावा केल्या होत्या. मात्र, गेल्या काही सामन्यांत त्याला धावांसाठी झगडावे लागले आहे. सततच्या क्रिकेटमुळेच त्याला सर्वोत्तम कामगिरी करता येत नसल्याचे क्लार्कला वाटते.

''गेल्या काही सामन्यांतील आपल्या कामगिरीने रोहित नक्कीच नाखूश असेल. त्याच्याकडून अपेक्षित खेळ होत नसल्याचे अन्य कोणी त्याला सांगायची गरज नाही. फलंदाज म्हणून आपल्या कामगिरीचे पुनरावलोकन करण्यात तो सक्षम आहे. त्याने यंदाच्या 'आयपीएल'ची दमदार सुरुवात केली होती. त्यानंतर कामगिरीत सातत्य राखता न आल्याने तो निराश असेल. माझ्या मते, तो थोडा दमलेला दिसत असून त्याला विश्रांतीची गरज आहे,'' असे क्लार्कने नमूद केले.

''विश्रांतीचा रोहितला खूप फायदा होईल. ट्वेन्टी-२० विश्वचषकापूर्वी तो ताजातवाना होऊ शकेल. मात्र, तो भारतीय संघाचा कर्णधार आहे आणि मुंबई इंडियन्सचा प्रमुख फलंदाज आहे. त्यामुळे त्याला विश्रांती घेणे थोडे अवघड जाईल. परंतु काहीही करून त्याला पुन्हा लय मिळवावी लागेल. भारतीय संघासाठी त्याची कामगिरी खूप महत्त्वाची ठरणार आहे,'' असेही क्लार्क म्हणाला. गेल्या आठवड्यात कोलकाता नाइट रायडर्सविरुद्धच्या सामन्यात रोहित प्रभावी खेळाडू (इम्पॅक्ट प्लेयर) म्हणून खेळला होता. त्याने क्षेत्ररक्षण केले नव्हते. त्यामुळे त्याच्या तंदुरुस्तीबाबत काही प्रश्न उपस्थित केले जात होते.

# गुडबाय हास्यजत्रा ; गौरवने घेतला हास्यजत्रेचा निरोप

सोनी मराठीवरील महाराष्ट्राची हास्यजत्रा हा प्रेक्षकांचा लाडका कार्यक्रम. या कार्यक्रमामुळे आजवर मराठी इंडस्ट्रीला एक से एक टॅलेंटेड कलाकार मिळाले आहेत. यातीलच एक गाजलेला कलाकार म्हणजे गौरव मोरे. "अशी सुरुवात करत सगळयांचं लक्ष वेधून घेणाऱ्या गौरवला महाराष्ट्राची हास्यजत्रामुळे खूप प्रसिद्धी मिळाली.

गौरव आता पुन्हा या कार्यक्रमात प्रेक्षकांना दिसणार नाही. नुकतंच सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत त्याने महाराष्ट्राची हास्यजत्रा हा कार्यक्रम सोडत असल्याचं जाहीर केलं. रसिक प्रेक्षक आपण हया साध्या मुलाला खूप प्रेम दिलं. नाव दिलं सन्मान दिलात त्याबद्दल मी आणि माझा परिवार आपले कायम ऋणी आहोत..

मला सांगताना खूप वाईट वाटतय की मी गौरव मोरे आपल्या लाडक्या मालिकेतून म्हणजेच "महाराष्ट्राची हास्य जत्रा" मधुन आपला निरोप घेत आहे.

माझ्या कामातून कोणच्या भावना दुखावल्या गेल्या असतील तर मी त्या सगळ्यांची मनापासुन माफी मागतो.



महाराष्ट्राची हास्य जत्रा सोडून अगदीच काही दिवस झाले आणि नवा शो घेऊन तुमच्या भेटीला आलो माध्यम सारखं राहिलं आणि तुमचं प्रेम देखील ! असं म्हणतात ना नव्या प्रवासाची गोष्ट और असते आणि म्हणूनच नव्या प्रवासात नव्या शो साठी तुमचा खंबीर पाठिंबा कायम असावा. नवा प्रवास सुरू झाला आणि यातून देखील तुमच्या सारख्या रसिक प्रेक्षकांचं खळखळून मनोरंजन करणार आहे म्हणून तुमचा आशीर्वाद आणि शुभेच्छा प्रेम असच राहू दे"

गौरवच्या या पोस्टवर अनेकांनी कमेंट करत त्याला नव्या इनिंगसाठी शुभेच्छा दिल्या. हास्यजत्रामधील त्याचे सहकारी कलाकार समीर चौघुले, प्रियदर्शिनी इंदलकर यांनीही कमेंट करत गौरवला त्याच्या नव्या इनिंगसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. समीर यांनी "तुला खूप शुभेच्छा...गौरव....खूप प्रेम" असं म्हणत गौरवला शुभेच्छा दिल्या.

# रणवीरने सोशल मीडियावरून हटवले त्याच्या लग्नाचे फोटो



बॉलिवूडमधील सगळयांचं लाडकं कपल दीपिका पदुकोण आणि रणवीर सतत चर्चेत असतात. दीपिका आणि रणवीर हे लवकरच आई-बाबा होणार असून नुकतंच त्यांच्या बेबीमूनचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले. त्यांच्या व्हेकेशनची चर्चा सोशल मीडियावर सुरु असतानाच रणवीरच्या सोशल मीडियावरील कृतीने सगळयांचं लक्ष वेधून घेतलं.

रणवीरने मंगळवारी ७ मे ला त्याच्या इंस्टाग्राम हॅण्डलवरून त्यांच्या लग्नाचे सगळे फोटो काढून टाकले. हे फोटो त्याने डिलीट केले आहेत कि अर्काइव्ह केले आहेत हे मात्र अजून समजू शकलं नाहीये. हे करण्यामागचं कारणही रणवीरने उघड केलं नाहीये.

त्या दोघांचे लेटेस्ट फोटो सोशल मीडियावर त्याने तसेच ठेवले असून २०१८ मध्ये पार पडलेल्या त्यांच्या लग्नाचे फोटो त्याने सोशल मीडियावरून काढून टाकले. आता रणवीरच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर फक्त १३३ पोस्ट्स उपलब्ध आहेत.

रणवीरची ही कृती त्याची सोशल मीडिया स्ट्रॅटेजी असावी असं म्हंटलं जातंय. या आधी दीपिकानेही असंच पाऊल उचललं होतं. ३१ डिसेंबर २०२० ला दीपिकाने तिच्या सोशल मीडियावरील सगळ्या पोस्ट काढून टाकल्या होत्या आणि एक ऑडिओ नोट शेअर केली होती ज्यात ती आता चाहत्यांसाठी नवीन काहीतरी घेऊन येणार असल्याचं म्हंटलं होतं. तर काही काळाने दीपिकाने तिच्या लग्नाचे फोटोज परत व्हिजिबल केले होते.

रणवीर आणि दीपिकाने फेब्रुवारीला महिन्यात ते दोघेही लवकरच आई-बाबा होणार असल्याचं जाहीर केलं.

■ सप्टेंबर महिन्यामध्ये दीपिकाला बाळ होणार आहे. यानंतर दीपिका फार कमी वेळा कोणत्याही कार्यक्रमात दिसली. त्यांनी शेवटची अंबानी कुटूंबाच्या प्री-वेडींगला एकत्र हजेरी लावली होती. दीपिका सध्या जास्तीत जास्त वेळ आराम करत असून ती फार कमी सोशल मीडियावर अॅक्टिव्ह असते. तर रणवीरही वेळात वेळ काढून तिच्यासोबत टाइम स्पेंड करताना दिसतोय.

■ वर्क फ्रंटवर लवकरच दीपिकाचा कल्की २८९८ एडी हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीस येतोय. या सिनेमात तो अभिनेता प्रभास सोबत स्क्रीन शेअर करणार आहे तर अमिताभ बच्चन आणि कमल हसन यांच्या या सिनेमात मुख्य भूमिका आहेत. यासोबतच 'सिंघम अगेन' सिनेमात तिचा स्पेशल अपिरिअन्स असणार असून या सिनेमात ती तिच्या नवऱ्यासोबत स्क्रीन शेअर करतेय. तर रणवीर आदित्य धारच्या आगामी सिनेमात काम करत असून लवकरच या सिनेमाचं शूटिंग सुरु होईल यासोबतच तो 'डॉन ३' मध्येही काम करतोय.

# प्ले-ऑफमध्ये जाण्यासाठी चढाओढ!



सनरायझर्स हैदराबाद - दोन्ही संघांनी अकरा सामन्यांमधून सहा सामन्यांमध्ये विजय संपादन केले असून पाच सामन्यांमध्ये त्यांना पराभवाचा सामना करावा लागला आहे. दोन्ही संघांना प्ले ऑफमध्ये पोहोचण्यासाठी विजय आवश्यक आहे. हैदराबादचा संघ घरच्या मैदानावर लखनौचा सामना करणार आहे.

हैदराबादच्या संघाला मागील चारपैकी तीन सामन्यांमध्ये पराभवाला सामोरे जावे लागले आहे. फलंदाजांप्रमाणे त्यांना गोलंदाजीतही अपयश आले आहे. ट्रॅव्हिस हेडचा अपवाद वगळता हैदराबादच्या फलंदाजांकडून निराशा झाली आहे. अभिषेक शर्मा याने आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे; पण मागील चारपैकी फक्त एका सामन्यात त्याला ३०च्या वर धावा करता आल्या आहेत.

मुख्य प्रशिक्षक डॅनियल व्हेट्टोरी यांनी या वेळी मत व्यक्त करताना म्हटले की, प्रत्येक सामन्यात सलामीवीरांनी धावा करायला हव्यात, असे होऊ शकत नाही. मधल्या फळीकडूनही धावा व्हायला हव्यात. हेनरिक क्लासेन व नितीशकुमार रेड्डी या मधल्या फळीतील फलंदाजांकडून सातत्याने धावा करण्यात आलेल्या नाहीत. याचा फटकाही हैदराबादला बसत आहे.

हैदराबादचा गोलंदाजी विभाग पूर्णपणे कर्णधार पॅट कमिन्सच्या खांद्यावर अवलंबून आहे. टी. नटराजन प्रभावी कामगिरी करीत आहे; पण सामन्याला कलाटणी देणारी गोलंदाजी त्याच्याकडून अद्याप झालेली नाही. भुवनेश्वरकुमारला प्रतिमेला साजेशी कामगिरी करता आलेली नाही. मार्को यान्सेन, जयदेव उनाडकट यांच्याकडूनही सपशेल निराशा झालेली आहे.

फलंदाजांनी खेळ उंचावण्याची गरज

कोलकता संघाकडून लखनौला मोठ्या फरकाने हार पत्करावी लागली. या धक्क्यातून बाहेर येत लखनौला आता हैदराबादचा सामना करावयाचा आहे. कर्णधार के. एल. राहुल, निकोलस पूरन व मार्कस स्टॉयनिस या प्रमुख फलंदाजांनी दबावाखाली आपला खेळ उंचावण्याची गरज आहे. आयुष बदोनी या भारतीय खेळाडूला या मोसमात सूर गवसलेला नाही. लखनौसाठी ही चिंतेची बाब ठरली आहे.

युवा वेगवान गोलंदाज मयंक यादव याने कमी लढतींमध्ये ठसा उमटवला आहे; पण दुखापतीमुळे आता त्याला आयपीएलमधून माघार घ्यावी लागली आहे. मोहसिन खान यालाही दुखापत झाली आहे. त्यामुळे आता यश ठाकूर, कृणाल पंड्या व रवी बिश्नोई या भारतीय गोलंदाजांवर लखनौच्या गोलंदाजीची मदार असणार आहे. या सर्वांना हैदराबादच्या फलंदाजांना रोखावे लागणार आहे.

## दैनिक राशी भविष्य

**मेष** –प्रदीर्घ आजारातून तुम्ही बरे व्हाल. परंतु स्वार्थी व लगेच चिडणा*या व्यक्तीला टाळा, कारण ती व्यक्ती तुम्हाला तणावात टाकू शकते - परिणामी समस्या अधिकच गंभीर रूप धारण करू शकेल.

**वृषभ** – अत्यंत व्यस्त वेळापत्रकातदेखील आपले आरोग्य चांगले असेल. पण आरोग्यालाल गृहित धरू नका. आयुष्याची काळजी घेणे ही आपली गरज आहे.

**मिथुन** – आपल्या मद्यापानाच्या सवयीवर ताबा मिळविण्यासाठी शुभ दिवस आहे. मद्यापान हा तुमच्या आरोग्याचा सर्वात वाईट शत्रू आहे, त्यामुळे तुमच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो हे तुम्हाला समजून घ्यावे लागेल.

**कर्क** – खेळावर काही रक्कम खर्च करा, कारण निंरतर चिरस्थायी तरुणाईचे ते गुपित आहे. चांगली गुंतवणूक फक्त परतावा मिळवून देतील - त्यामुळे तुमच्या कष्टाचे पैसे गुंतवताना नीट विचार करा. मुलांकडून गोड बातमी समजल्यानंतर आनंदी व्हाल.

**सिंह** – घरात काम करताना विशेष काळजी घ्यावी लागेल. घरगुती वस्तुंची बेफिकीरपणे हाताळणी करणे तुम्हाला अडचणीत टाकू शकते.

**कन्या** – कामाच्या धबडग्यात मधेमध्ये थोडा आराम करा, विश्रांती घ्या आणि रात्रीची जागरणे टाळा. आर्थिक व्यवहार आणि वायदे अतिशय काळजीपूर्वक सांभाळा. घरातील कुणी सदस्याच्या व्यवहाराने तुम्ही चिंतीत राहू शकतात. तुम्हाला त्यांच्याशी बोलण्याची आवश्यकता आहे.

**तुळ** – आरोग्य चांगले राहील. गुंतवणूक करणे बऱ्याच वेळा तुमच्यासाठी खूप फायदेशीर ठरेल आज तुम्हाला ही गोष्ट लक्षात येऊ शकते कारण जुन्या गुंतवणुकीतून आज तुम्हाला उत्तम नफा होऊ शकतो. मुलांमुळे आजचा दिवस खूप कठीण होण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक** – तुम्ही काही नवीन गोष्ट शिकण्यासाठी योग्य नाहीत, खूप म्हातारे झाला आहात असे काही लोकांना वाटेल - परंतु ते खरे नाही - तुम्ही नवीन गोष्टी सहजपणे आत्मसात करू शकता कारण तुम्ही चाणाक्ष आहात आणि तुमचे मन कार्यरत असते.

**धनु** – शारीरिक आजारातून बरे होण्याचे शक्यता मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे तुम्ही खेळाच्या स्पर्धांमध्ये भाग घेऊ शकाल.

**मकर** – आज तुमची प्रकृती फारशी बरी नसल्यामुळे तुम्हाला तुमच्या कामावर लक्ष केंद्रीत करणे जड जाईल. स्थावर जंगम मालमत्ता गुंतवणूक लाभदायी ठरेल.

**कुंभ** – आरोग्यासंदर्भातील कोणत्याही प्रश्नावर दुर्लक्ष होणार नाही याची काळजी घ्या. दिवसाच्या उत्तरार्धात आर्थिक स्थिती सुधारेल. घरगुती कामं कंटाळवाणी होतील आणि मानसिक तणावाला निमंत्रण देणारी असतील. प्रेमाचा प्रवास मधुर पण क्षणकाल टिकणारा असेल. नव्या संकल्पना फलप्रद ठरतील.

**मीन** – तुमचे विनयशील वागण्याबद्दल कौतुक होईल. अनेक लोक तुमच्यावर स्तुतिसुमने उधळतील. चढउतारांमुळे फायदा होईल. तुम्हाला आनंदी ठेवण्यासाठी तुमची मुले सर्वतोपरीने प्रयत्न करतील. प्रेमीला आज तुमच्या कुठल्या गोष्टीचे वाईट वाटू शकते.

# कॅन्सर प्रतिबंधक लसीकरण केव्हा सुरू होणार?

नागपूर : ९ ते १४ वयोगटातील मुलींना कॅन्सर प्रतिबंधात्मक लस (पॅपिलोमाव्हायरस) देण्याची घोषणा सरकारने विधानसभेत करून कॅन्सरचे रुग्ण तपासणीसाठी राज्यात चतु:सूत्री कार्यक्रम आखण्यात आला आहे, असे सांगण्यात आले होते. परंतु अद्याप यावरील भारतीय बनावटीची प्रभावी प्रतिबंधक लस देण्याच्या मोहिमेला सुरुवात झालेली नाही. ही मोहीम केव्हा सुरू होणार असा प्रश्न उपस्थित झालाय.




गर्भाशयमुख कॅन्सरग्रस्त ६२ हजारांवर महिला आहेत. अशा रुग्णांचा जनजागृती आणि उपचाराअभावी अल्पावधीत मृत्यू होतो. आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी घोषणा करून महिलांमध्ये उमेद वाढविली होती. परंतु घोषणेची अंमलबजावणी झाली नाही. एचपीव्ही विषाणूचे प्रमाण शरीर संबंध असलेल्या लोकांमध्ये जास्त प्रमाणात आहे. महिलांचा हा छुपा शत्रू असल्याने लवकर लक्षात येत नाही, मात्र लक्षात येतो तेव्हा आजार गंभीर झालेला असतो. यावर इतर देशांत लसीकरणावर भर दिला जातो. एकूण कॅन्सरग्रस्त महिलांपैकी ६ ते २९ टक्के महिला या कॅन्सरने त्रस्त असतात. देशात ५३ पैकी एका महिलेस या आजाराची जोखीम आहे. कॅन्सरबद्दल समाजात जनजागृती आवश्यक आहे.

देशात : -२०२० मध्ये ७५ हजार २०९ प्रकरणांची नोंद - ३३ हजार ०९५ मृत्यू


राज्यात : - २०२० मध्ये महाराष्ट्रात २ हजार ९५२ मृत्यू

मुलींच्या मनात या लशीविषयी काही समज-गैरसमज असू शकतात. त्याविषयीही योग्य जनजागृती होण्याची गरज आहे. गगर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग होण्यास अनेक वर्षे लागतात. त्यामुळे त्याची लक्षणे सुरवातीला दिसत नाहीत.

यामुळे ही एचपीव्ही लस परिणामकारक ठरते. शासनाकडून मोफत लसीकरण कधी होणार हे माहीत नाही, मात्र काही स्वंयसेवी संस्थांच्या मदतीने सवलतीच्या दरात ही लस दिली जाते. शाळांमध्ये, वस्त्यांमधून प्रतिसाद मिळाल्यास आयएमएतर्फे ही मोहीम सुरु करण्यात येईल.

**-डॉ. मंजूषा गिरी, अध्यक्ष- इंडियन मेडिकल असोसिएशन, नागपूर.**

# उन्हामुळे वाढले डोळ्यांच्या ॲलर्जीचे प्रमाण



**■ उन्हाळयात शरीरात पाण्याच्या कमतरतेमुळे अनेक गंभीर समस्यांचा धोका असतो. यामुळे तुम्हाला डोळे कोरडे होण्याची समस्या देखील होऊ शकते. त्यामुळे डोळ्यांचे नुकसान होण्यापासून वाचवण्यासाठी दिवसभरात पुरेशा प्रमाणात पाणी पिणे आवश्यक आहे. डोळे कोरडे पडत असल्याची समस्या दिसल्यास अथाव तशी लक्षणे आढळल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.**

**- डॉ. दर्शन कुलट, नेत्ररोग चिकित्सक, अकोट.**

**■ उन्हाळयात स्किन केअरसाठी बरेच लोक सनस्क्रीन वापरतात. परंतु, डोळयांजवळ आणि डोळ्यांच्या आजूबाजूला किंवा पापण्यांच्या भागात ते वापरताना सावधगिरी बाळगली पाहिजे. सनस्क्रीन, ज्यात एसपीएफ जास्त असते, ते चुकून आत गेल्यास डोळ्यांना त्रास होऊ शकते. जरी यामुळे डोळ्यांना कायमचे नुकसान होणार नाही परंतु, यामुळे डोळ्यांच्या भागावर जळजळ होऊ शकते.**

**- डॉ ऐश्वर्या द. कुलट, नेत्ररोग विशेष शल्य चिकित्सक, अकोट.**

अकोट : उन्हाळयाच्या दिवसांत डोळ्यांच्या अनेक समस्या निर्माण होत असतात. डोळयांचीही काळजी घेणे अत्यंत गरजेचे असून, सूर्याच्या अतिनील किरणांपासून डोळयांचे संरक्षण करण्यासाठी आपण लेन्स असलेले गॉगल्स वा काळे गॉगल्स वापरले पाहिजेत.

तसेच डोळे कोरडे होण्यासाठी काळजी घ्यावी, असा सल्ला महाराष्ट्र शासन (आरोग्य सेवा)चे माजी नेत्रचिकित्सक अधिकारी तथा दृष्टी संयोजक डॉ.सुहास कुलट यांनी दिला आहे. या ऋतूत सूर्याची किरणे अधिक प्रखर होत असल्याने अनेकांचे डोळे कोरडे पडतात.

अति उष्णतेमुळे शरीरातले पाणी शोषून घेतले जाते, ज्यामुळे डोळ्यांमधील पाणी देखील सुकते. अशावेळी डोळ्यांची योग्य काळजी घेतली नाही, तर कोरड्या डोळ्यांच्या समस्या उद्भवतात. म्हणून उन्हाळयात डोळ्यांची विशेष काळजी घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी 'सकाळ'शी बोलतांना सांगितले.

सूर्यापासून येणारे अल्ट्राव्हायलेट किरणे डोळयांकरिता हानिकारक असतात. ही अल्ट्राव्हायलेट किरणे प्रकाशाहून अधिक वेगाने येतात. त्यामुळे फक्त उन्हातच नाही तर सावलीत देखील डोळ्यांशी निगडीत आजार होण्याची शक्यता असते.

यावर उपाय म्हणून उन्हात फिरताना सनग्लासेस जरूर लावा जे तुमच्या डोळ्यांचे अल्ट्राव्हायलेट किरणांपासून संरक्षण करतील. केवळ उन्हात फिरतानाच नाही तर सावलीत देखील सनग्लासेस लावायला हवी.

एरव्ही फॅशनकरिता वापरल्या जाणाऱ्या हॅट्स देखील तुम्हाला या हानिकारक किरणांपासून सुरक्षित ठेवतात. जास्त पाणी पिल्याने शरीरातील पाण्याचे प्रमाण योग्य राहते आणि युव्ही किरणांच्या घातक परिणामांपासून आरोग्याचे संरक्षण होते. या ऋतूमध्ये डोळ्यांच्या अलर्जीचे प्रमाण वाढण्याची शक्यता असते. तापमानातील प्रदूषणातील झालेली वाढ लक्षात घेता हा त्रास होऊ शकतो असे डॉ. सुहास कुलट सांगतात.

## दिनविशेष

### घटना

२०१४: नेदुरुमल्ली जनार्दन रेड्डी - भारतीय राजकारणी (जन्म: २० फेब्रुवारी १९३५)

२००८ : पं. फिरोझ दस्तूर - किराणा घराण्याचे शास्त्रीय गायक

१९९९ : करमसीभाई जेठाभाई सोमय्या उद्योगपती

१९९५ : अनंत माने - मराठी चित्रपट दिग्दर्शक (जन्म: २२ सप्टेंबर १९१५)

१९८६ : शेर्पा टेन्झिंग नॉर्गे - एडमंड हिलरी यांच्यासोबत सगळ्यात पहिल्यांदा माउंट एव्हरेस्ट शीखर सर करणारे गिर्यारोहक (जन्म: २९ मे १९१४)

१९७६: उलिक मेनहॉफ - जर्मन अत्यंत डावे दहशतवादी, रेड आर्मी गटाचे सहसंस्थापक, पत्रकार (जन्म: ७ ऑक्टोबर १९३४)

१९५९: कर्मवीर भाऊराव पाटील - भारतीय शिक्षणतज्ज्ञ - पद्म भूषण (जन्म: २२ सप्टेंबर १८८७)

१९३१: अल्बर्ट मायकेलसन - जर्मन-अमेरिकन पदार्थवैज्ञानिक - नोबेल पुरस्कार (जन्म: १९ डिसेंबर १८५२)

१९२७ : प्रिन्स कार्ल - बव्हेरियाचे राजकुमार (जन्म: १ एप्रिल १८७४)

१९१९: नारायण वामन टिळक - रेव्हरंड (जन्म: ६ डिसेंबर १८६१ )

१९१७ : कान्होबा रणझोडदास डॉक्टर, कवी व शास्त्रज्ञ -

१९०५: ॲन जार्विस - मातृदिन (मदर्स डे) च्या सहसंस्थापिका (जन्म: ३० सप्टेंबर १८३२)

### जन्म

१९३९: केन वॉर्बी - ऑस्ट्रेलियन मोटरबोट रेसर, पाण्यावरील २७५.९७ नॉट्स वेगाचा जागतिक विक्रम करणारे

१९२८ : वसंत नीलकंठ गुप्ते - समाजवादी कामगारनेते, लेखक व समाजवादाचे अभ्यासक (निधन: ९ सप्टेंबर २०१०)

१८८६: केशवराव मारुतराव जेधे - स्वातंत्र्यसैनिक, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील नेते (निधन : १२ नोव्हेंबर १९५९) १८८२ : हेन्री जे. कैसर - कैसर शिपयार्ड आणि कैसर एल्युमिनियमचे संस्थापक (निधन: २४ ऑगस्ट १९६७)

१८६६: गोपाल कृष्ण गोखले - भारतीय थोर समाजसेवक (निधन : १९ फेब्रुवारी १९१५)

१८१४ : दादोबा पांडुरंग तर्खडकर - इंग्लिश व्याकरणकार, ग्रंथकार व धर्मसुधारक (निधन: १७ ऑक्टोबर १८८२) १५४०: महाराणा प्रताप मेवाडचे महाराजा (निधन: १९ जानेवारी १५९७)

### निधन

१९९९: अटलांटा ग्रांप्री नेमबाजी स्पर्धेत भारताच्या रुपी उन्नीकृष्णनने प्रोन गटात रौप्यपदक पटकाविले.

१९५५: पश्चिम जर्मनी देशाचा नाटो (NATO) मधे प्रवेश.

१९३६: इटलीने इथिओपिया देश बळकावला.

१९०४: वाफेवर चालणारे सिटी ट्रुरो हे इंजिन १६० किमी ताशी पेक्षा जास्त वेगाने धावणारे यूरोपमधील पहिले इंजिन बनले... १८७७: पेरू देशाच्या किनारपट्टीवरील झालेल्या ८.८ तीव्रतेच्या भूकंपामुळे २५४१ लोक ठार झाले.

१८७४ : मुंबईत घोड्यांनी ओढल्या जाणाऱ्या ट्राम सुरू झाल्या

## Patanjali case: Endorsers just as responsible for misleading ads, says SC



New Delhi : The Supreme Court on Tuesday said that celebrities and influencers are "equally responsible" for misleading advertisements and asked them to act with responsibility while endorsing products.

"We are of the opinion that the advertisers or the advertising agencies or endorsers are equally responsible for issuing false and misleading advertisements. The endorsements by public figures, influencers, celebrities, et cetera, go a long way in promoting a product and it is imperative for them to act with responsibility when endorsing any product in the course of advertisements," a bench of Justices Hima Kohli and Ahsanuddin Amanullah said.

The court was hearing a plea by the Indian Medical Association (IMA), accusing Patanjali Ayurved of allegedly issuing misleading advertisements and passing critical remarks against allopathy. The bench which had issued contempt notices to Yoga guru Ramdev, Patanjali, and its MD Acharya Balkrishna over the matter, on Tuesday also sought response from the IMA president R V Asokan regarding an interview he gave to news agency PTI, terming his statements as "very, very unacceptable". It told the IMA counsel, "here your client goes to the press, and makes a statement. When you were saying the other side (Patanjali Ayurved) was misleading the public. (But) what were you doing?"

The court said that the rules and regulations are meant to ensure that the consumer is made aware of the kind of product, particularly in the health and the food sector. "As a tide over measure, it is deemed appropriate to direct that before an advertisement is permitted, a self declaration is obtained from the advertiser on the lines of the cable, television network rules, 1994" and the self declaration shall be uploaded on the Broadcast Seva portal run under I&B Ministry.

## माढा मतदारसंघात 60 टक्के मतदान!

### माढ्यातून लीड कोणाला मिळणार निंबाळकरांना की मोहिते पाटलांना धाकधूक वाढली!

सोलापूर - माढा लोकसभा मतदारसंघात मतदानाच्यावेळी अत्यंत चुरस पाहायला मिळाली. त्यामुळे एकंदरीतच माढ्याचा निकाल अत्यंत अटी-तटीत सुटणार अशा चर्चा गाव-खेड्याच्या पारावर सुरू आहेत. फलटण आणि माण खटावमध्ये भाजप उमेदवार खासदार रणजित निंबाळकर यांना भरभरून मतदान झाल्याच्या चर्चा आहेत. तर माळशिरस तालुक्यात मोहिते पाटील यांना भरभरून मतदान झाल्याचं बोललं जात आहे. त्यामुळे निकालाचा अंदाज वर्तवणं तसं अवघडंच आहे. मतदारराजाचा कौल मतपेटीत बंद झालाय, सर्वांना आतुरता आहे, 4 जूनच्या मतमोजणीची. त्यामुळे माढ्यात गुलाल कोण उधणार हे पाहणं अत्यंत महत्त्वाचं ठरणार आहे.

दिवसभर असणारे 44 डिग्री पेक्षा जास्त अपमानामुळे सकाळी लवकर आणि संध्याकाळीपूर्वी ठिकठिकाणी मतदारांनी रांगा लावून मतदानाचा हक्क बजावला. माढा लोकसभेत 11 लाख 92 हजार 190 म्हणजे जवळपास 60 टक्के मतदान झालं आहे. यात सर्वात जास्त मतदान हे फलटण येथे ६४ टक्के तर सर्वात कमी मतदान करमाळा येथे ५५टक्के झालं आहे. माढा तालुका ६१टक्के, माळशिरस ६० टक्के, माण ५८ टक्के मतदान झाले. मतदानाच्या वेळी सर्वात तणावपूर्ण स्थिती सांगोला तालुक्यात होती. सांगोला तालुक्यात देखील ६० टक्के मतदान होताना हाणामारी आणि बाचाबाचीच्या घटना समोर आल्या होत्या. यात बागलवाडी येथे एका तरुणानं थेट ईव्हीएम मशीन जाळण्याचाही प्रयत्न केला. मात्र, सुदैवानं मशीनला कोणताही धोका न पोचल्यानं पुनर्मतदान घेण्याची वेळ आली नाही. करमाळा शहरामध्ये दिवसभर शांततेत मतदान झालं असताना संध्याकाळी एका तरुणानं खिशात आणलेल्या हातोडीनं ईव्हीएम मशीन फोडण्याचाही प्रयत्न केला.

माढ्यात मनोज जरांगे इफेक्टनं धाकधूक वाढवली

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत निवडणुकीत मनोज जरंगे यांचा इफेक्ट माढा, सांगोला आणि करमाळा तालुक्यात चांगलाच जाणवला. या तालुक्यातील ग्रामीण भागातील मतदारांनी मराठा आरक्षणामुळे आपला राग सत्ताधारी भाजपवर काढल्याचं चित्र दिसत होतं. याचवेळी ओबीसी मतदारांनीही भाजपाला भरभरून मतदान केल्याचे समोर आले . या मतदानात जरांगे फॅक्टर सरस ठरणार कि ओबीसी मतदान हे देखील 4 जून रोजी समोर येणार आहे . माढा विधानसभा मतदारसंघातील आमदार बबनदादा शिंदे आणि शिवसेनेचे शिवाजी सावंत हे दोन्ही प्रमुख गट एकत्र आल्याने बहुतांश ठिकाणी मनोमिलन झालेले दिसले असले तरी काही ठिकाणी मात्र एक गट तुतारीच्या मागे गेला आहे . सांगोला तालुक्यातही




अश्याच प्रकारची स्थिती असून आमदार शहाजीबापू आणि माजी आमदार दीपक साळुंखे यांनी संपूर्ण ताकद लावल्याने या भागात जरांगे इफेक्ट कमी दिसला .


माढ्याचा निकाल खरा फलटण आणि माण खटाव विरुद्ध माळशिरस यावरच ठरणार आहे. इतर मतदारसंघात कोठेही कोणत्याच पक्षाला मोठे लीड मिळण्याची शक्यता नाही. यात सर्वात महत्वाचा असणारा वंचित फॅक्टर किती चालणार आणि तो कोणाची मतं घेतं यावर संपूर्ण निकाल अवलंबून असणार आहे. मात्र, माढा लोकसभा मतदारसंघातील मुस्लिम समाज हा शरद पवार गट आणि वंचित या दोघात विभागाला जाणार आहे. याच पद्धतीनं दलित मतात देखील यावेळी मोठी विभागणी झाली असून आज माढ्याचा नेमका अंदाज बांधणं शक्य नाही, तरी येणाऱ्या निकालात भाजपचे निंबाळकर किंवा राष्ट्रवादीचे धैर्यशील मोहिते यांच्यात जिंकणाऱ्याचं मताधिक्य हे १५ ते २५ हजारात असणार असल्याचं बोललं जातं.

## ...तर हे राम मंदिराला कुलूप ठोकतील - अमित शाह

लखीमपूर : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी बुधवारी लखीमपूरमध्ये एका प्रचारसभेला संबोधित केलं. समाजवादी पक्षाचे नेते रामगोपाल यादव यांच्या विधानाचा त्यांनी समाचार घेतला.

"हे लोक राम मंदिराला बेकार म्हणतात.. तुम्ही जराही चूक केली तर हे राम मंदिराला बाबरी नावाचं कुलूप ठोकतील. उत्तर प्रदेशात जेव्हा समाजवादी पक्षाचं सरकार होतं तेव्हा गुंडाराज सुरु होतं. जमिनींवर कब्जे केले जात होते. होळी-दिवाळीला वीज नसायची आणि रमजानमध्ये २४ तास वीज असायची." असा आक्षेप अमित शाहांनी घेतला.

शाह पुढे म्हणाले की,




काँग्रेस, सपा आणि बसपावाले खोटा प्रचार करुन भाजप आणि मोदींना बदनाम करत आहेत. मोदींना ४०० जागा दिल्या तर ते आरक्षण संपवतील, असं म्हणत आहेत. कर्नाटकात काँग्रेसला बहुमत मिळालं तर त्यांनी मागास प्रवर्गाचं आरक्षण काढून मुस्लिमांना पाच टक्के आरक्षण दिलं. मागासांच्या आरक्षणाला धक्का लावल्याचं काम काँग्रेस पक्षाने केलं आहे, असा हल्ला त्यांनी चढवला.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी राहुल गांधींचा खरपूस समाचार घेतला. "राहुल गांधी म्हणतात एका झटक्यात गरीबी दूर करु. तुमच्या आजीने एका झटक्यात आणीबाणी घोषित केली होती. वडिलांनी एका झटक्यात तीन तलाख लागू केला होता. तुमच्या पक्षाने एका झटक्यात मागासांचं आरक्षण काढून घेण्याचं काम केलं." अशा शब्दांत शाहांनी टीका केली.

अमित शाहांनी त्यांच्या भाषणात सीएएचा उल्लेख करुन काँग्रेसवर निशाणा साधला. ते म्हणाले की, राहुलबाबा म्हणात आम्ही सीएए हटवू.. आरे राहुल बाबा.. तुमची नानी जरी वरतून आली तरी सीएए हटणार नाही. तुमच्याकडे न नेता आहे, न नियत आहे, न निती आहे.. आहे ती केवळ घराणेशाही, असा सणसणीत टोला शाहांनी लगावला.

## डॉ. मुस्तफा युसूफ अली गोम लिखित 'नरेंद्र मोदी संवाद, नये भारत का संकल्प' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले



मुंबई, डॉ. मुस्तफा युसूफ अली गोम लिखित 'नरेंद्र मोदी संवाद, नये भारत का संकल्प' हे पहिले पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उत्साही आणि दूरदर्शी नेतृत्वाला समर्पित हे पुस्तक भारतीय जनतेच्या आशा आणि स्वप्नांचे प्रतिबिंब आहे. या पुस्तकाद्वारे डॉ. गोम यांनी पंतप्रधान मोदींची नेतृत्वशैली आणि त्यांनी विकसित केलेला आदर्श भारताचा दृष्टिकोन शेअर केला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली देशाच्या सर्वांगीण विकासाच्या दिशेने झालेल्या प्रगतीवर हे पुस्तक प्रकाश टाकते.

अंत्योदयापर्यंत पोहोचण्याच्या पंतप्रधान मोदींच्या तत्त्वज्ञानाने प्रेरित होऊन, डॉ. गोम यांनी या पुस्तकात त्यांच्या विचारांचे आणि निर्णयांचे विश्लेषण केले आहे, ज्यामुळे त्यांना देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर लोकप्रियता मिळाली आहे.

'नरेंद्र मोदी संवाद, नये भारत का संकल्प' हे पुस्तक मुंबई हिंदी अकादमीने प्रकाशित केले असून ते पेपरबॅक आवृत्तीत उपलब्ध आहे. त्यांच्या नाविन्यपूर्ण विचार आणि लेखनासाठी प्रशंसित, डॉ. गोम हे एक प्रतिष्ठित विचारवंत आणि लेखक आहेत.

## Priyanka Gandhi reacts to PM Modi's 'Ambani-Adani' attack on brother Rahul Gandhi





New Delhi | Hours after Prime Minister Narendra Modi said that he wonders why the Congress leader Rahul Gandhi stopped "abusing" industrialists Gautam Adani and Mukesh Ambani since elections were declared, the party's national general secretary Priyanka Gandhi reacted to the remark, saying her brother speaks about them daily. n an election rally in Rae Bareli, Priyanka Gandhi Vadra also accused the Modi government of waiving loans worth 16 lakh crore for billionaires when farmers in Uttar Pradesh were dying due to suicide.

"Today, Narendra Modi said that Rahul Gandhi is not taking Adani's name. The truth is this-Rahul Gandhi talks about Adani every day, he puts the truth about Adani in front of you everyday and exposes it," Priyanka Gandhi said.

The Congress leader further added that Rahul Gandhi tells the public every day about the "nexus" between the Prime Minister and big industrialists.

₹Rahul Gandhi tells you daily that Narendra Modi has a nexus with big industrialists. Narendra Modi waived off 16 lakh crore of his friends but did not waive off a single rupee of the farmers. Narendra Modi should answer this, she said.

In a counterattack against Rahul Gandhi's over his 'crony capitalism' charge at his government, Prime Minister Narendra Modi on Wednesday said that he wonders why Rahul Gandhi has stopped taking the names of industrialists Gautam Adani and Mukesh Ambani since the declaration of the Lok Sabha elections.

He also questioned if tempo loads of notes (money) has reached the Congress.

₹Ever since elections have been announced, these people (Congress) have stopped abusing Ambani-Adani. I want to ask from Telangana soil, let the Shehzada announce, how much has been lifted from Ambani-Adani. Has tempo loads of notes (currency) reached the Congress? What deal has been arrived at, that abusing Ambani-Adani has stopped overnight, he asked.

The PM further added: "Certainly something is fishy. For five years, (they) abused Adani-Ambani and it stopped overnight. It means you have received some tempo loads of 'chori ka maal' (loot). You have to answer to the nation."

## Neeraj Chopra to compete in India for first time since Tokyo Olympics gold as he charts glory at Paris 2024

Sports | Neeraj Chopra will be competing in India after a long time as the reigning Olympic champion gears up to defend his Tokyo Olympics title at the Paris Olympics, which will be held from July 26 to August 11 this year.

Neeraj will be in action at the 27th National Federation Cup athletics championships in Odisha, which will be held from May 12 to May 15 at the Kalinga Stadium, Bhubaneswar.

This will be Chopra's first domestic competition since 2021 Federation Cup.

Before the Federation Cup, the World Championships, Asian Games and Commonwealth Games champion will be taking part at the Doha Diamond League meet, which happens on May 10. Neeraj will be competing in the men's javelin throw event in Doha along with compatriot Kishore Jena.

Neeraj had spoken about his goals for the season previously.

"I want to be in best possible shape before Paris Olympics. My training sessions have gone off really well so far.




I always lay stress on fitness along with strength and technique. This is the best I have felt in a long time but I must add that training and competition are not the same. When you wear the India jersey, the feeling is different, the josh (energy) is unbelievable," Neeraj had said to SAI Media.

Talking about the elusive 90-metre mark, the 26-year-old Neeraj said again that 'distance doesn't matter to him.'

"What matters to me is staying 100 per cent fit, being consistent during the season and delivering on the day that matters. I think there are mistakes to fix and looking at the increasing competition all around, one has to keep improving. The road will close if you think you have done it all," he said.

Talking about how his performance in Tokyo indicated that his preparation for global tournaments was going in the right direction, Neeraj said, "I have won medals in two World Championships, threw my personal best (89.94 metres at Stockholm), won a dream Diamond League title and even defended my gold at the Asian Games. All in all, I have been in great space and want to carry forward that momentum from May onwards."


## Bombay HC directs BMC to provide 10 water tankers daily for 2,000 families in Gorai, says no municipality can shirk off its duty

Mumbai | While directing the Brihanmumbai Municipal Corporation to provide 10 water tankers of 10,000 litres each daily for over 2,000 families in Gorai, the Bombay High Court on Wednesday observed that no municipal body can shirk off its duty to ensure adequate potable water for residents.

A division bench of Chief Justice Devendra Kumar Upadhyaya and Justice Arif S Doctor passed the order on a PIL petition filed by the Gorai Villagers Welfare Association stating that over 2,000 families consisting of 7,000 residents in the area lacked adequate clean drinking water.

The court also asked the BMC to ensure that the construction of an underground suction pump and tanks, because of which residents in the north-western part of the city were facing water scarcity, will be completed expeditiously.

Senior advocate Anil Singh, appearing for the



BMC, informed the court that to overcome the difficulty, four tankers had been employed to provide potable water to the concerned residents. He said the construction work would likely be completed by the end of 2024 and that the problems might then be substantially reduced.

The bench noted that it was the duty of municipalities as per Article 243-W of the Constitution to ensure water supply for domestic and commercial purposes and that the Mumbai Municipal Corporation Act also cast the duty on the BMC.

However, the bench said it was not concerned with industrial use, adding that the supply of potable water for domestic use should be given the "highest priority."

"Thus, a distinct duty constitutionally as well statutorily cast on the corporation to ensure residents within its limit are provided with adequate and proper access to potable water for domestic use. No corporation/municipality can shirk off its shoulders from said responsibility and duty," the order read.

The bench also opined that four tankers of water for a population for over 2000 families were not sufficient. "Please have a humane approach," it told the BMC.

The bench then directed that 10 tankers of potable water be provided daily. "The said water supply shall be ensured that it is uninterrupted and quality of water shall also be ensured and only properly treated water shall be supplied. We also hope and expect that construction of the suction pump and water tank shall also be expedited," it added.

The bench asked the BMC to file its affidavits in reply within six weeks, after which the petition will be heard next.

## थोडक्यात

### मुंबई पोलिसांनी पवईमध्ये नाकाबंदीत व्हॅनमध्ये 4 कोटी 70 लाखांची कॅश पकडली



.मुंबई, प्रतिनिधी :

मुंबई पोलिसांनी पवई परिसरात नाकाबंदी करत एका व्हॅनमधून तब्बल 4 कोटी 70 लाखांची कॅश पकडली आहे. पवई पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये गार्डन बीट चौकीजवळ पवई पोलिसांकडून नाकाबंदी लावण्यात आली होती. पवई पोलिसांनी आयकर विभाग आणि निवडणूक कार्यालयात याची माहिती दिली. त्यानंतर निवडणूक अधिकाऱ्यांनी त्या कॅशचा बारकोड स्कॅन केल्यानंतर बारकोड मिस मॅच झाला. यानंतर आयकर विभागाने या कॅश आणि गाडी आपल्या ताब्यात घेऊन ही रोकड कुठून आणली आणि एटीएममध्ये भरण्यासाठी घेऊन जात होते की, निवडणुकीमध्ये या रोकडचा वापर केला जाणार होता का? या संदर्भात अधिक तपास आयकर विभाग करत आहेत.

एकीकडे निवडणुकीची रणधुमाळी सुरु असताना पैशाचा गैरवापर टाळण्यासाठी पोलिस आणि निवडणूक अधिकाऱ्यांकडून प्रयत्न सुरु आहेत. पवई पोलिसांनी आता रोकड जप्त केली आहे. दरम्यान, रोख रक्कम जप्त करण्याची ही पहिली वेळ नाही. काही दिवसांपूर्वी मुंबईच्या, सायन, घाटकोपर आणि भांडुप या भागातही पैशाने भरलेली व्हॅन जप्त करण्यात आली होती.

### शॉरमा खाताना सावधान ! मुंबईत १९ वर्षीय मुलाचा मृत्यू, विक्रेत्याविरुद्ध कारवाई



.मुंबई, प्रतिनिधी :

चटपटीत आणि स्वादिष्ट खाण्याची सवय अनेक खवय्यांना असते. मग खवय्यांकडून खाऊ गल्ली किंवा प्रसिद्ध दुकानांचा शोध सुरु होतो. अनेकवेळा स्वस्तात मिळणारे बेकायदेशीर खाद्यपदार्थ खाल्ले जातात. परंतु काही खाताना चांगल्या ठिकाणी खाणे गरजेचे आहे. अन्यथा ते खाणे जीवावर बेतू शकते. मुंबईत असाच धक्कादायक प्रकार घडला आहे. शॉरमामधून विषबाधा झाल्यामुळे एका १९ वर्षीय मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. मानखुर्दमधील महाराष्ट्र नगरमध्ये राहाणाऱ्या प्रथमेश भोकसे याने त्या भागातील एका स्टॉलवर शॉरमा खाल्ला. त्यानंतर त्याला त्रास होऊ लागला. त्या ठिकाणी शॉरमा खाणाऱ्या इतर दहा ते बारा जणांना त्रास सुरु झाला. या लोकांना उलट्या, जुलाब आणि मळमळीचा त्रास होऊ लागला. प्रथमेशला शुक्रवारी तातडीने रुग्णालयात दाखल केले होते. परंतु उपचार सुरु असताना त्याचा मंगळवारी मृत्यू झाला. मुलाचा मृत्यू होताच शॉरमा विक्रेत्याविरोधात मानखुर्द पोलीस ठाण्यात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात दोघांना अटक करण्यात आली आहे.

शॉरमातील चिकन खराब असल्याचा पोलिसांना संशय आहे. हा खराब शॉरमा खाल्ल्याने प्रथमेश भोकसे याचा मृत्यू झाल्याचा अंदाज आहे. ट्रोम्बे पोलिसांनी या प्रकरणात गुन्हा दाखल केला आहे. दोघांना अटक केली आहे. त्या लोकांनी शॉरमासाठी लागणारे मांस कुठून आणले होते, त्याची चौकशी पोलीस करत आहेत.

# मोदींच्या नेतृत्वाखाली देशात शिवशाही आणि रामराज्य आणणार - नितीन गडकरी

.पुणे, प्रतिनिधी :



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आम्हाला देशात शिवशाही आणि रामराज्य आणायचे आहे, असे भाजपचे ज्येष्ठ नेते व केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले. मोदी सरकारने गेल्या दहा वर्षात केलेले काम हा फक्त ट्रेलर होता, खरा चित्रपट तर अजून सुरू व्हायचा आहे, असेही ते म्हणाले. मावळ लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारासाठी कर्जत तालुक्यात चौक फाटा येथे झालेल्या जाहिर सभेत गडकरी बोलत होते.

नितीन गडकरी म्हणाले की, प्रत्येकाला घर, गावागावात पाणी, शाळा, दवाखाना, रस्ता, वीज, शेतीमालाला भाव व रोजगार हे आमचे उद्दिष्ट आहे. आपल्या देशाला भय, भूक, दहशतवाद आणि भ्रष्टाचार यापासून मुक्त करायचे आहे. या देशात छत्रपती शिवाजी महाराजांची 'शिवशाही' आणि प्रभू रामचंद्रांचे रामराज्य आणण्यासाठी नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान होणे आवश्यक आहे. त्यासाठी मावळच्या मतदारांनी बारणे यांना विक्रमी मताधिक्याने निवडून द्यावे.

मावळ विधानसभा मतदारसंघात जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (जेएनपीटी) विकसित झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होणार आहे. पनवेल ते उरण हा आठ पदरी रस्ता पूर्ण झाला आहे. पागोटे ते चौक हा 4,500 कोटी रुपयांच्या रस्त्याचे काम निवडणुकीनंतर सुरू होईल व पुढील एक-दीड वर्षात पूर्ण होईल. या रस्ते विकासाबरोबरच रस्त्यांच्या कडेला लॉजिस्टिक पार्क व इंडस्ट्रियल हब होतील व त्यातून किमान दहा हजार तरुणांना रोजगार मिळेल. या नोकऱ्यांमध्ये 80 टक्के जागा या स्थानिक भूमिपुत्रांना मिळाव्यात, अशी शासनाची भूमिका राहणार असल्याचं ते म्हणाले.

कळंबोली जंक्शन येथील वाहतूक समस्येवर प्रभावी उपाययोजना म्हणून बहुमजली उड्डाणपूल बांधण्यात येणार असून सुमारे 1600 कोटी रुपये खर्चून हा आंतरराष्ट्रीय दर्जाचा प्रकल्प उभारण्यात येईल. हे कामही निवडणुकीनंतर सुरू होईल, असे त्यांनी सांगितले. सागरमाला प्रकल्पांतर्गत या भागात तब्बल दोन लाख कोटी रुपयांची कामे सुरू आहेत. प्रधानमंत्री सडक योजनेअंतर्गत साडेचार लाख गावांना रस्त्याने जोडण्यात आले आहे. अजून दोन लाख गावांना रस्त्याने जोडण्याचे काम सुरू आहे किंवा व्हायचे आहे, या सरकारने आत्तापर्यंत 50 लाख कोटी रुपयांची विकास कामे केली आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

देशात कन्याकुमारी ते काश्मीर पर्यंत रस्त्यांची कामे सुरू आहेत. रस्ते झाले की विकास होतो. त्यातून रोजगार मिळतो आणि त्यातून गरिबी दूर होते, याकडे गडकरी यांनी लक्ष वेधले. काँग्रेसने गरीबी हटावचा नारा दिला होता, पण त्यातून फक्त काँग्रेसवाल्यांची गरिबी दूर झाली, असा टोलाही त्यांनी लगावला. देशात एवढे मोठे रस्त्यांचे जाळे उभे करू शकलो, याचे सर्व श्रेय पुन्हा मतदारांना आहे, असे सांगून गडकरी म्हणाले की, तुम्ही भरघोस मतांनी बारणे यांना निवडून दिले नसते, तर मोदी पंतप्रधान झाले नसते आणि मी देखील मंत्री झालो नसतो. त्यामुळे देशातील विकासाचे सर्व श्रेय मतदारांना जाते.

## बारामती मतदार संघात मतदान संपताच दुचाकीवरून आलेल्या दोघांनी केला हवेत गोळीबार

.बारामती, प्रतिनिधी :



संपूर्ण देशाचे लक्ष मंगळवारी बारामती लोकसभा मतदार संघाकडे लागले होते. बारामती लोकसभा निवडणुकीचे मतदान सुरु असताना आरोप-प्रत्यारोप सुरु होते. यंदा बारामती मतदार संघात कमी मतदान झाले. परंतु मतदान संपल्यावर धक्कादायक घटना घडली आहे. बारामती लोकसभा मतदार संघात येणाऱ्या वारजे माळवाडी भागात गोळीबार झाला. या भागातील रामनगरमध्ये दुचाकीवरून आलेल्या दोघांनी हवेत गोळीबार केल्याची घटना रात्री १०.३० वाजता घडली. या घटनेमुळे खळबळ उडाली आहे. घटनेमुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला आहे.

पुणे शहरात दिवसेंदिवस गुन्हेगारी वाढली आहे. किरकोळ कारणावरुन कोयता हल्ले झाल्याच्या अनेक घटना यापूर्वी घडल्या. परंतु गेल्या काही महिन्यांपासून गोळीबाराच्या घटना घडत आहेत. यामुळे पुणे शहरातील कायदा आणि सुव्यवस्थेसंदर्भात प्रश्न निर्माण झाला आहे. मंगळवारी पुणे शहरातील भाग असलेल्या परंतु बारामती लोकसभा मतदार संघात येणाऱ्या वारजे येथील रामनगरमध्ये दुचाकीवरुन आलेल्या दोघांनी हवेत गोळीबार केला. रात्री साडेदहा वाजता घडलेल्या या घटनेमुळे परिसरात दहशत निर्माण झाली. आरोपींनी गोळीबार करुन मुंबई पुणे हायवेवरुन कात्रजच्या दिशेने पळ काढला.आरोपींना गोळीबार का केला? हे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. गोळीबार केलेल्या आरोपींचा वारजे पोलिसांकडून शोध सुरु करण्यात आला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यात येत आहे. परंतु गोळीबाराच्या वाढत्या घटनांमुळे परिसरात दहशत निर्माण झाली आहे.

## कैद्यांनाही वैद्यकीय उपचार मिळण्याचा अधिकार; उच्च न्यायालयाचे निरीक्षण



.मुंबई, प्रतिनिधी :

कैद्यांनाही वैद्यकीय उपचार मिळण्याचा अधिकार असून तो त्यांचा आत्मसन्मानाचा हक्क आहे, असे निरीक्षण उच्च न्यायालयाने आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात अटकेत असलेले जेट एअरवेजचे संस्थापक नरेश गोयल यांना अंतरिम वैद्यकीय जामीन मंजूर करताना नोंदवले आहे. कच्चा कैदी म्हणून उपचार घेणे आणि कोणत्याही बंधनात नसलेल्या सर्वसामान्य व्यक्तीने उपचार घेणे यामध्ये फरक आहे, असेही न्यायमूर्ती निजामुद्दीन जमादार यांच्या एकल खंडपीठाने स्पष्ट केले. गोयल यांच्या वैद्यकीय चाचण्या, अहवालांचा अभ्यास केल्यानंतर ते आजारी नाहीत असे म्हणू शकत नाही. तसेच, गोयल हे आवडीच्या खासगी रुग्णालयात उपचार घेत असल्याने त्यांना जामीन नाकारावा हा सक्तवसुली संचालनालयाचा (ईडी) युक्तिवादही मान्य करता येणार नाही. किंबहुना, एखाद्या व्यक्तीला आवश्यक उपचार मिळाल्यास तो जामिनास पात्र नाही हा युक्तिवाद स्वीकरणे म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या अभिव्यक्ती स्वातत्र्यांवर गदा आणण्यासारखे आहे, असेही न्यायालयाने गोयल यांची वैद्यकीय कारणास्तव अंतरिम जामीन मंजूर करण्याची मागणी मान्य करताना नमूद केले. गोयल हे खटल्यापासून पळ काढण्याची किंवा पुरावे नष्ट करण्याचीही शक्यता नाही, असेही न्यायालयाने म्हटले.

## मी आई सोबत मतदानाला गेलो, तरी हे राजकारण करतात; अजित पवारांनी बोलून दाखवली खंत

.मंचर, प्रतिनिधी :



संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या बारामती लोकसभा मतदारसंघात मंगळवारी मतदान पार पडलं. उपमुख्यमंत्री अजित पवारांनी आपल्या पत्नी आणि बारामती लोकसभा मतदारसंघाच्या उमेदवार सुनेत्रा पवार, तसेच, मातोश्री आशाताई अनंतराव पवार यांच्यासोबत काटेवाडीतील मतदान केंद्रावर जाऊन मतदानाचा हक्क बजावला. श्रीनिवास पवारांनी आरोप केल्यापासूनच अजित पवारांच्या निर्णयावर त्यांच्या मातोश्री नाराज असल्याच्या चर्चांनी राजकीय वर्तुळात जोर धरला होता. अशातच अजित पवारांनी आईसोबत मतदान केंद्र गाठल्यानं श्रीनिवास पवारांना अजित पवारांनी उत्तर दिल्याचं बोललं जात होतं. अशातच आईसोबत मतदान केल्यामुळे सुरू असलेल्या राजकीय वर्तुळातील चर्चांबाबत खंत व्यक्त केली. बुधवारी शिरुरमधील सभेत बोलताना माझ्या आईसोबत मतदानाला गेलो, तुमच्या का पोटात दुखलं? असा थेट सवाल अजित पवारांनी विचारला आहे.

बारामती लोकसभा मतदारसंघासाठी मंगळवारी मतदान पार पडलं. यावेळी अजित पवार आणि कुटुंबियांनी काटेवाडीतील मतदान केंद्रावर जात मतदानाचा हक्क बजावला. अजित पवार हे जेव्हा मतदानाला आले तेव्हा त्यांची आई आशाताई अनंतराव पवार या त्यांच्यासोबत होत्या. या दोघांनीही मतदान केल्यानंतर अजित पवार यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. तेव्हा अजितदादांनी आपली आई सोबत आल्याचा उल्लेख आवर्जून केला. आमच्या घरात सर्वात ज्येष्ठ आशाताई अनंतराव पवार आहेत. आज माझी आई माझ्यासोबत आहे, याची नोंद सर्वांनी घ्यावी, असं त्यांनी सांगितलं. त्यांनी हे वक्तव्य करुन एका दगडात दोन पक्षी मारले अशा चर्चांना राजकीय वर्तुळात उधाण आलं. एकीकडे माझी आई घराण्यात सर्वात ज्येष्ठ असल्याचं अधोरेखित करुन शरद पवार यांना टोला लगावला असल्याचं बोललं जात होतं. तर दुसरीकडे माझी आई मतदानाला माझ्यासोबत आल्याचं सांगत ती माझ्याच बाजूनं असल्याचा संदेशही अजितदादांनी आरोप करणाऱ्या श्रीनिवास पवारांना दिल्याचं बोललं जात होतं.

## इंटर्नशिप प्रमाणपत्रामुळे अनेक विद्यार्थी पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशापासून वंचित राहणार



.नाशिक, प्रतिनिधी :

नीट पीजी परीक्षेनंतर पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशास पात्र ठरण्यासाठी इंटर्नशिप प्रमाणपत्र सादर करण्याच्या मुदतीमुळे अनेक विद्यार्थी या प्रवेशापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. नॅशनल मेडिकल कौन्सिलमार्फत (एनएमसी) प्रमाणपत्र सादरीकरणासाठी १५ ऑगस्टपर्यंत मुदत दिलेली आहे. अनेक विद्यार्थ्यांची इंटर्नशिप सप्टेंबरपर्यंत लांबणार असल्याने, त्यांना मुदतीत प्रमाणपत्र सादर करणे शक्य नाही. परिणामी त्यांना प्रवेशापासून वंचित राहावे लागण्याची शक्यता असून, राज्यात असे ४५० तर देशभरात जवळपास ४ हजार विद्यार्थी आहेत.

वैद्यकीय पदवी अभ्यासक्रम (एमबीबीएस) पूर्ण केल्यानंतर वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी नीट पीजी ही प्रवेश परीक्षा द्यावी लागते. या प्रवेशपरीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना एमबीबीएस अभ्यासक्रमादरम्यान इंटर्नशिप पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र प्रवेशापूर्वी सादर करावे लागते. यासाठी 'एनएमसी'मार्फत १५ ऑगस्ट ही तारीख दिली आहे. जे विद्यार्थी या तारखेपर्यंत सर्टिफिकेट जमा करतील, त्यांचाच प्रवेश निश्चित केला जाणार आहे. परंतु, देशातील विविध राज्यांच्या आरोग्य विद्यापीठांमधील विद्यार्थ्यांच्या इंटर्नशिप पूर्ण होण्यास सप्टेंबर महिना उजाडणार आहे.

या विद्यापीठांनी दिलेल्या वेळापत्रकानुसार संबंधित विद्यार्थ्यांची इंटर्नशिप सुरू झाली. वेळापत्रकाप्रमाणेच ती संपणार असल्याने १४ ऑगस्टपर्यंत या विद्यार्थ्यांना इंटर्नशिपचे प्रमाणपत्र सादर करणे शक्य नाही. असे महाराष्ट्रात ४५०, आंध्र प्रदेशात ५००, तर देशभरात जवळपास चार हजार विद्यार्थी आहेत. त्यामुळे हे प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत १५ सप्टेंबरपर्यंत करावी, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे.

## पॅलेस्टाईन-इस्त्रायल वादावर सोशल मीडियावर केली पोस्ट, मुख्याध्यापिकेने गमावली नोकरी

.मुंबई, रतिनिधी :



मुंबईतील शाळेत धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. शाळेच्या मुख्याध्यापिकेवर हमाससंदर्भात सहानुभूती दर्शवणारी पोस्ट केल्याचा आरोप आहे. मुंबईतील सोमय्या शाळेत गेल्या 12 वर्षांपासून काम करणाऱ्या परवीन शेख यांच्याबाबत हा प्रकार घडला आहे. शेख यांची या प्रकरणात चौकशी सुरु होती. चौकशीनंतर त्यांना राजीनामा देण्याचे सांगण्यात आले होते. परंतु त्यांनी राजीनामा दिला नाही. यामुळे त्यांना नोकरीवरुन काढून टाकले. दरम्यान या प्रकाराबाबत बोलताना परवीन शेख यांनी सोमय्या शाळेने आपणास कोणतीही नोटीस न देता बेकायदेशीररित्या पदावरुन हटवल्याचे म्हटले आहे. सध्या पॅलेस्टाईन (हमास) आणि इस्त्रायल यांच्यात युद्ध सुरु आहे. या युद्धात हमासला सहानुभूती दर्शवणारी पोस्ट परवीन शेख यांनी केल्याच्या त्यांच्यावर आरोप आहे. यासंदर्भातील २४ एप्रिल रोजी एका संकेतस्थळावर वृत्त आले होते. त्याची दखल घेत सोमय्या शाळा व्यवस्थापनाने परवनी शेख यांची चौकशी सुरु केली. या चौकशीनंतर त्यांना २६ एप्रिल रोजी राजीनामा देण्यास सांगितले. परंतु त्यांनी राजीनामा दिला नाही. त्यांनी आपले काम सुरुच ठेवले.

सोमय्या शाळेच्या व्यवस्थापनाने परवीन शेख यांना लेखी खुलासा सादर करण्याचे आदेश दिले. त्यानंतर शेख यांनी सोमवारी ६ मे रोजी लेखी म्हणणे सादर केले. त्यात त्या राजीनामा न देण्याच्या भूमिकेवर ठाम होत्या. त्यांनी केलेला लेखी खुलासा आणि या प्रकरणाची करण्यात आलेल्या चौकशी प्रक्रियेनंतर त्यांना नोकरीवरून काढण्याचा निर्णय घेण्यात आला. शाळेने यासंदर्भात म्हटले की. आम्ही अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे संपूर्णपणे समर्थन करतो, परंतु मुख्याध्यापिका परवीन शेख यांनी समाजमाध्यमावर व्यक्त केलेली भूमिका ही 'सोमय्या व्यवस्थापन' जपत असलेल्या मूल्यांशी पूर्णपणे विसंगत आहे.

परवीन शेख म्हणतात

दरम्यान या प्रकाराबाबत परवीन शेख म्हणतात, मला 12 वर्षांच्या सेवेनंतर पदावरून हटवले. या प्रकाराचा मला प्रचंड बसला आहे. 12 वर्षे सेवा देऊनही शाळा व्यवस्थापने सोशल मीडियावरील खोट्या अफवांना बळी पडत माझ्यावर कारवाई केली आहे. ही कारवाई राजकीय दबावापोटी केली आहे. या कारवाई विरोधात मी कोर्टात जाण्याचा विचार करत आहे.

## डोंबिवली पूर्वेतील टिळक रस्त्यावरील छेद गल्लीतील बेकायदा बांधकाम निवडणुकीनंतर होणार भुईसपाट

.डोंबिवली, प्रतिनिधी :



डोंबिवली पूर्वेतील टिळक रस्त्यावरील छेद गल्लीतील सुयोग हॉल समोरील गल्लीत आराधना या जुन्या पुनर्निर्माणाच्या बेकायदा इमारतीचे बांधकाम पालिकेच्या फ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त चंद्रकांत जगताप यांनी सहा महिन्यापूर्वीच विहित प्रक्रिया पूर्ण करून अनधिकृत घोषित केले आहे. हे बांधकाम निवडणूक संपताच पालिकेकडून जमीनदोस्त केले जाणार आहे.बांधकाम सुरू असलेल्या सुयोग हॉल गल्लीत आराधना नावाची जुनी इमारत होती. ही इमारत गेल्या वर्षी तोडण्यात आली. या इमारती समोर नऊ मीटरचा रस्ता नाही. जगदीश खेडेकर या भूमाफियाने ही इमारत उभारली असल्याचे फ प्रभाग कार्यालयातील अभिलेखावरून स्पष्ट झाले आहे.या इमारतीला पुरेसे क्षेत्र नसल्याने भूमाफिया जगदीश खेडेकर यांनी कल्याण डोंबिवली पालिका नगररचना विभागाच्या बांधकाम परवानग्या न घेता गेल्या वर्षी या बेकायदा इमारतीची उभारणी सुरू केली. या इमारती विषयी तक्रारी प्राप्त होताच, सहा महिन्यापूर्वी फ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त चंद्रकांत जगताप यांनी आराधना या जुन्या इमारतीच्या जागेवर बांधण्यात येत असलेल्या बेकायदा इमारतीचा बांधकामधारक खेडेकर यांना नोटिसा पाठवून इमारत बांधकाम परवानगीची कागदपत्रे सादर करण्यास सांगितले.

## धक्कादायक! प्रसूतीसाठी आलेल्या एका महिलेच्या गर्भपिशवीत चक्क कापडच गेलं राहून

.भंडारा, प्रतिनधी :



डॉक्टर हे देवाचं दुसरं रूप असं म्हणतात. प्रयत्नांची पराकाष्ठा करून आजारी, जखमी रुग्णाला वाचवणारे, जीवदान देणारे हे डॉक्टर प्रत्येक पेशंटसाठी देवासमानच असतात. मात्र कधी याच डॉक्टरमुळे रुग्णाचा जीव धोक्यात आला तर? त्याच्या निष्काळजीपणामुळे रुग्णाला यातना सहन कराव्या लागल्या तर ? असाच एक धक्कादायक प्रका भंडारा जिल्ह्यातील तुमसर येथील सुभाषचंद्र बोस उपजिल्हा रुग्णालयात घडला आहे. प्रसूतीसाठी आलेल्या एका महिलेच्या गर्भपिशवीत चक्क कापडच राहून गेलं. डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे हा प्रकार घडल्याचे उघडकीस आले. अखेर त्या महिलेवर पुन्हा शस्त्रक्रिया करून, तिच्या गर्भपिशवीतून ते कापड बाहेर काढण्यात आले आणि तिला वेदनांपासून मुक्ती मिळाली. या घटनेमुळे रुग्णांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. तर दोषी डॉक्टरवर कारवाईची मागणी करण्यात येत आहे. तुमसर तालुक्यातील तामसवाडी येथील हिमानी हरिराम पांडे ही महिला पहिल्या प्रसूतीकरीता उपजिल्हा रुग्णालय तुमसर येथे दि. २४ एप्रिला दाखल झाली होती. दि. २५ एप्रीलला तिची नॉर्मल प्रसूती झाली. नॉर्मल प्रसूतीनंतर तुला अधिक प्रमाणात रक्तस्त्राव होऊ लागला. त्यामुळे तेथे कापड ठेवण्यात आले. अती रक्तस्त्राव होत असल्यास गर्भ पिशवी जवळ कापड ठेवले जाते आणि ते कापड १२ ते २४ तासाच्या आत काढावे लागते, अशी माहिती एका वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिली.मात्र उपजिल्हा रुग्णालयातील एका स्त्री रोग तज्ञ व अन्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी बाळंतपण झाल्यानंतर गर्भ पिशवीजवळ लावलेला कापड न काढताच ओल्या बाळंतिणीला दि. २७ तारखेला रुग्णालयातून सुट्टी देण्यात आली. मात्र घरी गेल्यावर तीन ते चार दिवसांनी हिमानी हिला असह्य वेदना होवू लागल्या. तसेच घाण वास येऊ लागला. त्यामुळे हिमानी घाबरली आणि तिने सगळं पतीला सांगितले.

## तपास यंत्रणांची भीती दाखवून ज्येष्ठ महिलेची दोन कोटींची फसवणूक

.पुणे, प्रतिनिधी :




विमानतळावर परदेशातून पाठवलेल्या पाकिटात अमली पदार्थ सापडल्याची बतावणी करून नागरिकांची फसवणूक करण्याचे सत्र सुरू आहे. सायबर चोरट्यांनी कोरेगाव पार्क भागातील एका ज्येष्ठ महिलेची दोन कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला असून, याप्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.याबाबत एका ज्येष्ठ महिलेने फिर्याद दिली आहे. २६ एप्रिल रोजी ज्येष्ठ महिलेच्या मोबाइल क्रमांकावर सायबर चोरट्याने संपर्क साधला. फेडेक्स कुरिअर कंपनीच्या कार्यालयातून आकाशकुमार बोलत असल्याची बतावणी चोरट्याने केली. मुंबई विमानतळावर फेडेक्स कुरिअर कंपनीकडून पाठविण्यात आलेले पाकिट सीमाशुल्क विभागाने (कस्टम) जप्त करण्यात आले आहे. पाकिट अमली पदार्थ सापडले असून, याप्रकरणी मुंबईतील अमली पदार्थ विभागात (नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो) गुन्हा दाखल करण्यात आला. कारवाई टाळायची असेल तर एक ॲप डाऊनलोड करा, असे चोरट्याने सांगितले. बँक खात्याची माहिती चोरट्याने घेतली. बँक खात्याची माहिती पडताळण्यासाठी तुमच्या खात्यातील सर्व पैसे माझ्या खात्यात पाठवा, अशी बतावणी चोरट्याने केली.